सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ४ था ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## कोण होणार? अमरावतीच्या १७ व्या महापौरपदी विराजमान

### महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावती महापालिकेच्या महापौरपदासाठी आज गुरूवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. हे पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आता अमरावतीच्या १७ व्या महापौरपदासाठी मोठी स्पर्धा राहील. स्पष्ट झाले आहे.महापालिकेचया निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने सत्ता स्थापन करण्यासाठी विविध पक्षांकडून मोर्चेबांधणी केली जात आहे. आता महापौर निवडीची प्रक्रिया लवकरच सुरू होईल. या आरक्षणामुळे कुणाला संधी मिळणार, याची उत्सुकता आहे.

१० मार्च १९९२ रोजी अमरावतीच्या प्रथम महापौरपदी डॉ. देवीसिंह शेखावत हे विराजमान झाले होते. १९९२ ते ८ मार्च २०२२ या ३० वर्षांच्या काळात अमरावती महापालिकेत १६ महापौरांनी धुरा सांभाळली आहे. ९ मार्च २०२२ पासून महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे.नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक २५ जागांवर विजय मिळवला आहे. युवा स्वाभिमान पक्ष १५, काँग्रेस १५, एमआयएम १२, राष्ट्रवादी अजित पवार गट ११, शिवसेना शिंदे गट ३, बसप ३, शिवसेना ठाकरे गट २ आणि वंचित १ अशी सदस्यसंख्या




आहे. ८७ सदस्यीय महापालिकेत महापौरपदाची निवडणूक जिंकण्यासाठी ४४ सदस्यांचे संख्याबळ आवश्यक राहणार आहे. कुठल्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसले, तरी भाजप, युवा स्वाभिमान आणि मित्रपक्षांची सत्ता स्थापन होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.अमरावतीच्या महापौरपदी विराजमान होण्याची संधी आजवर सोळा जणांना मिळाली आहे. त्यात पाच महिलांचा समावेश आहे. डॉ. देवीसिंह शेखावत हे प्रथम महापौर बनले, त्यानंतर प्रभाकर सव्वालाखे, गोविंद अग्रवाल, विद्याताई देशपांडे, किरणताई महल्ले, प्रवीण काशीकर, नितीन वानखडे, विलास इंगोले, दीपाली गवळी, मिलिंद चिमोटे, अशोक डोंगरे, ॲड किशोर शेळके, वंदना कंगाले, चरणजीत कौर नंदा, संजय नरवा आणि चेतन गावंडे यांनी महापौरपद भुषविले आहे.

आता सतराव्या महापौरपदी कोण विराजमान होणार, याचे औत्सुक्य आहे. महापौरपदासाठी उमेदवार निवडणे हे राजकीय पक्षांसमोर आव्हान असणार आहे. महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपने पुढाकार घेतला आहे. युवा स्वाभिमान या मित्र पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनीही युवा स्वाभिमान पक्षाच्या मदतीने भाजपचा महापौर होईल, असे जाहीर केले आहे. त्यामुळे भाजपमधील नगरसेवकांमध्ये हे मानाचे पदमिळवण्यासाठी स्पर्धा राहणार आहे. महापौरपदाच्या निवडीसाठी हालचालींना आता गती मिळणार आहे.

**१५ महापालिकांवर महिला राज**

५० टक्के महिला आरक्षणाचे नियम लागू केल्यानं राज्यातील १५ महापालिकांवर महिला राज असणार आहे. १४ ठिकाणी सर्वसाधारण वर्गाला संधी मिळणार आहे. महिलांना असलेल्या ५० टक्के आरक्षणानुसार ४ महापालिकांमध्ये ओबीसी महिला, ९ महापालिकांमध्ये खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण लागू आहे.

### महाराष्ट्रातील २९ महापौरपदांसाठी आरक्षण

अनुसूचित जमाती - १
अनुसूचित जाती - ३
नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) - ८
सर्वसाधारण - १७

### राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौरपद आरक्षण पुढीलप्रमाणे

१. मुंबई - खुला प्रवर्ग , महिला
२. धुळे - खुला प्रवर्ग, महिला
३. नाशिक - खुला प्रवर्ग, महिला
४. भिवंडी-निजामपूर - खुला प्रवर्ग
५. परभणी - खुला प्रवर्ग
६. कल्याण-डोंबिवली - ड्ढ
७. पुणे - खुला प्रवर्ग , महिला
८. चंद्रपूर - ओबीसी महिला
९. कोल्हापूर - ओबीसी
१०. जळगाव - ओबीसी महिला
११. मिरा-भाईंदर - खुला प्रवर्ग महिला
१२. वसई-विरार - खुला प्रवर्ग
१३. अहिल्यानगर - ओबीसी, महिला
१४. पिंपरी-चिंचवड - खुला प्रवर्ग
१५. अकोला - ओबीसी महिला
१६. अमरावती - खुला प्रवर्ग
१७. जालना - अनुसूचित जाती महिला
१८. लातूर - अनुसूचित जाती - महिला
१९. छत्रपती संभाजीनगर - खुला प्रवर्ग
२०. नांदेड-वाघाळा - खुला प्रवर्ग महिला
२१. नवी मुंबई - खुला प्रवर्ग महिला
२२. पनवेल - ओबीसी
२३. ठाणे - अनुसूचित जाती
२४. उल्हासनगर - ओबीसी
२५. नागपूर - खुला प्रवर्ग महिला
२६. मालेगाव - खुला प्रवर्ग महिला
२७. इचलकरंजी - ओबीसी
२८. सांगली-मिरज-कुपवाड - खुला प्रवर्ग
२९. सोलापूर - खुला प्रवर्ग

## मुंबई महापौरपदाची सोडत निघाली सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

महानगरपालिकेचया निवडणुकीनंतर आता शहराच्या सत्ताकेंद्राकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विशेषतः मुंबईचा पुढील महापौर कोण होणार, याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता होती. अखेर महापौरपदासाठीची आरक्षण सोडत जाहीर झाली असून, यंदाचे मुंबई महापौरपद हे खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

महापालिकेच्या अटीतटीच्या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक जागा मिळवत आघाडी घेतली आहे. पश्चिम उपनगरांमध्ये भाजपचा प्रभाव अधिक दिसून आला असून, दहिसर, बोरीवली आणि चारकोप या विधानसभा क्षेत्रांतील सर्व १८ प्रभाग महायुतीकडे गेले आहेत. भाजपच्या १६ आणि शिंदे गटाच्या तीन जागांचा या यशात समावेश आहे. या पार्श्वभूमीवर महापौरपदाची सोडत कोणत्या प्रवर्गासाठी निघते, याकडे सर्व पक्षांचे लक्ष केंद्रित झाले होते.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका पूर्ण झाल्यानंतर आज सर्व महापालिकांतील महापौरपदासाठी आरक्षणाची सोडत काढण्यात



आली. मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत चक्राकार पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असल्याने, यंदा आरक्षण कोणत्या प्रवर्गाला मिळणार यावर वेगवेगळे तर्क लावले जात होते. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी महापौरपद आरक्षित होण्याची शक्यता वर्तवली जात होती. कारण या प्रवर्गातील दोन्ही नगरसेवक शिवसेना ठाकरे गटाकडे असल्याने, आरक्षण त्या प्रवर्गासाठी निघाल्यास त्याचा राजकीय फायदा ठाकरेंना होऊ शकतो, अशी चर्चा होती.

मात्र, आज जाहीर झालेल्या सोडतीनुसार मुंबई महानगरपालिकेचे महापौरपद हे खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे महापौरपदासाठी आता महिला नगरसेवकांमध्ये स्पर्धा रंगणार असून, प्रमुख पक्षांच्या राजकीय गणितांमध्येही बदल होण्याची शक्यता आहे.

महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता पुढील महापौर कोण होणार, याबाबत राजकीय हालचालींना वेग येणार आहे. बहुमताच्या गणितासोबतच योग्य महिला उमेदवाराच्या निवडीसाठी पक्षांतर्गत चर्चा सुरू होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे येत्या काळात मुंबईच्या महापौरपदावर कोण विराजमान होणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## पुणे महापौर पदी भाजपाच्या महिला नगरसेविकेची होणार निवड; दिग्गज नेत्यांचं स्वप्न भंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२पुणे**

पुणे- पुणे महानगरपालिकेसाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गाची सोडत निघाली असल्यानं भाजपाकडून काही नावांची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. भाजपा महिला नगरसेविका वर्षा तापकीर यांनी भाजपा हा सर्वांना न्याय देणारा पक्ष असल्याचं म्हटलं आहे. दुसरीकडं महिलांसाठी आरक्षण जाहीर झाल्यानं अनेक भाजपाच्या दिग्गज नेत्यांचा हिरमोड झाला आहे.पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून तब्बल ९२ महिलांना उमेदवारी देण्यात आली होती. यात ६७ महिला उमेदवार विजयी झाल्या आहेत. महापालिकेत महिलाराज असताना आत्ता महापौर पदासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गाची सोडत निघाली आहे. भाजपाकडून वर्षा तापकीर, मानसी देशपांडे, स्वरदा बापट, स्मिता वस्ते, मंजुषा



नागपूरे, ऐश्वर्या पठारे, सायली वांजळे आणि निवेदिता एकबोटे या नावांची महापौर पदासाठी जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी सोडत निघाल्यानं गेल्या काही वर्षांपासून भारतीय जनता पक्षामध्ये महापौर पदासाठी तयारी करणाऱ्या भाजपा नेत्यांचं स्वप्न भंग झालं आहे. माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी सभागृह नेते गणेश बिडकर या तीन नेत्यांनी निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती. त्यांच्या विजयानंतर कार्यकर्त्यांकडून फ्लेक्सबाजी करत महापौर म्हणून त्यांना शुभेच्छादेखील देण्यात आल्या होत्या.

भाजपा नगरसेविका वर्षा तापकीर म्हणाल्या, आमच्या लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्या लाडक्या बहिणीवर विश्वास दाखविला. मोठ्या प्रमाणावर महापालिकेच्या निवडणुकीत महिलांना संधी दिली आहे. दक्षिण पुण्यासाठी चार वेळा नगरसेविका म्हणून काम करण्याची मला भारतीय जनता पक्षानं संधी दिली आहे. पक्षश्रेष्ठी जे निर्णय घेतील, तो सर्वस्वी असणार आहे. जी संधी मिळेन, त्या संधीचं सोने करेन. पक्षनेतृत्वाचं कार्यकर्त्यांकडं लक्ष असते. भाजपा हा सर्वसामान्यांना न्याय देणारा पक्ष आहे.

## माधुरी मिसाळ यांनी महापौर आरक्षणावरील उद्धवसेनेचे आक्षेप फेटाळले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आज आरक्षणाची सोडत काढण्यात आली. यामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षणावरून वाद झाला आहे. मुंबईचं महापौरपद सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यानंतर उद्धवसेनेकडून या आरक्षण सोडतीला तीव्र आक्षेप घेण्यात आला. या आक्षेपांना आता नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी प्रत्युत्तर दिले आहे. उद्धवसेनेकडून घेण्यात आलेले आक्षेप हे नियमांना धरून नव्हते, असे मिसाळ यांनी सांगितले.

महानगरलापालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षणाची सोडत जाहीर झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना माधुरी मिसाळ म्हणाल्या की, ठाकरे गटाचे आक्षेप हे कुठल्याही गटाला धरून नव्हते. त्यांना मुंबईमध्ये ज्या प्रकारचं आरक्षण हवं होतं, त्याबाबत काय करता येईल, यासाठी त्यांनी तिथे आरडाओरडा केला. त्यांनी घेतलेला आक्षेप नोंदवून घेण्याचं काम आम्ही केलं आहे. मात्र त्यांनी जे आक्षेप घेतले आहेत, ते नियमांनुसार आणि नियमांना धरून नाहीत, असं प्रशासनाचं आणि आमचं म्हणणं आहे.

मुंबईमध्ये एसटी आरक्षण का नाही दिलं, ओबीसी आरक्षण का नाही दिलं, असा सवाल त्यांच्याकडून उपस्थित केला जात होता. पण जशी ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यात फेरफार करण्यास कुठलाही वाव नव्हता. तसेच या संपूर्ण प्रक्रियेचं चित्रिकरण केलेलं आहे. त्यामुळे या आक्षेपांमध्ये काही अर्थ नाही हे तुम्हालाही कळेल, असा टोलाही माधुरी मिसाळ यांनी लगावला.

दरम्यान, मुंबई महानगरपालिकेचया महापौरपदासाठीच्या आरक्षणाची सोडत खुल्या प्रवर्गातील महिलेला जाहीर करण्यात आल्यानंतर उद्धवसेनेच्या किशोरी पेडणेकर, आमदार मनोज जामसुतकर, निशिकांत शिंदे, राखी जाधव यांनी आक्षेप घेतला. आरक्षण सोडत पद्धतीमध्ये चक्राकार पद्धत पाळली गेली नसल्याचा आरोप ठाकरेंच्या सेनेने केला आहे. २०१९ आणि २०२२ या गेल्या दोन वेळेस सर्वसाधारण गटासाठी आरक्षित असताना आता पुन्हा सर्वसाधारण गटासाठी आरक्षण का निघालं? असा सवाल किशोरी पेडणेकर यांनी केला होता.

## मग आमच्यासोबत युती करायची नव्हती केडीएमसीत मनसेने शिंदेंना समर्थन दिल्याने राऊत संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

कल्याण डोंबिवली महापालिकेत मनसेने शिवसेनेला (शिंदे गट) समर्थन दिले आहे. ज्यामुळे केडीएमसीतील राजकीय गणिते बदलली आहेत. बुधवारी (ता. २१ जानेवारी) मनसे नेते राजू पाटील यांनी शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेत मनसेच्या नगरसेवकांचे त्यांच्या पक्षाला समर्थन असल्याचे सांगितले. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगलेल्या असतानाच खासदार शिंदेंनीच प्रसार माध्यमांना ही माहिती दिली. पण यामुळे शिवसेना ठाकरे गट चांगलाच संतापला आहे. मनसे - शिवसेना शिंदे गट हातमिळवणी होताच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी स्थानिक पातळीवरील नेत्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली. त्यानंतर आज (गुरुवार, २२ जानेवारी) पुन्हा राऊतांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला असता जर का शिवसेना शिंदे गटाला समर्थन द्यायचे होते, तर आमच्यासोबत युती करायची नव्हती, असे स्पष्ट राऊतांनी बोलून दाखवले आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार



संजय राऊत यांनी गुरुवारी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना केडीएमसीत मनसेने शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा दिला असल्याबाबत विचारणा करण्यात आली. तेव्हा ते याबाबत म्हणाले की, नितिमत्ता ओंडक्यासारखी वाहून जाऊ नये. कल्याण डोंबिवलीत जे घडले ती पक्षाची भूमिका असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. मात्र राज ठाकरेंनाही ती भूमिका मान्य नाही हे त्यांच्याशी चर्चा झाल्यावर आमच्या लक्षात आले. ही युती करायची होती तर कल्याण डोंबिवलीत शिवसेनेशी (ठाकरे गट) युती करायची नव्हती. त्यामुळे शिंदेंच्याबाबतीत आमची कडवट भूमिका आहे आणि ती राहील, असे राऊतांकडून स्पष्टपणे सांगण्यात आले.

आताही पडद्यामागे काय सुरू आहे याचीही माहिती आहे. अशा प्रकारची कोणतीही युती मराठी माणूस मान्य करत नाही. शिंदेंना धडा शिकवण्यासाठी आम्हाला यश मिळाले. असा कोणताही निर्णय घेतला जाणार नाही ज्यामुळे मराठी माणूस दुखावला जाईल, असेही राऊतांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

## निवडणुका झाल्या, कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले का? काँग्रेस, ठाकरे बंधूंबाबत नाराजीचा सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

विधानसभा, नगर पालिका अन् आता महापालिकांमध्येही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला ब्रँड दिग्विजयी असल्याचे सिद्ध केले. भाजपाने जवळपास ९ महापालिकांमध्ये स्वबळावर सत्ता गाठली असून २९ पैकी २४ महापालिकांवर भाजपा-शिंदेसेना युतीने वर्चस्व सिद्ध केले आहे. नगरपालिका निवडणुकांप्रमाणेच महापालिकांमध्येही भाजप सर्वाधिक जागा मिळवत नंबर एकचा पक्ष ठरला असून जवळपास सर्वच ठिकाणी भाजपाच्या जागा मागील वेळेपेक्षा वाढल्या आहेत. उद्धवसेना, शरद पवार गटाचे अस्तित्वच राहिले नाही. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन्ही बंधू एकत्र येऊनही मुंबईतील सत्ता राखू शकलेले नाहीत. हा दोन्ही ठाकरेंसाठी धक्का मानला जात आहे. यानंतर आता काँग्रेस, उद्धवसेना, मनसे यांनी कार्यकर्ते,



पराभूत उमेदवारांकडे पाठ फिरवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्याचे म्हटले जाते आहे.

नवी मुंबई निवडणुकीत महापालिकेच्या पक्ष कोणताही असो, सतत २० वर्षे नवी मुंबईकरांनी गणेश नाईक यांच्यावर विश्वास दाखविला आहे. यावेळी तर १११ पैकी ६५ नगरसेवक निवडून एकहाती सत्ता सोपविली. यापूर्वी सत्तासोपानावर आरूढ होण्यासाठी नाईकांना इतरांच्या कुबड्यांची गरज भासत होती. कधी काँग्रेस तर कधी अपक्षांची मदत घेऊन आपणच नवी मुंबईचे दादा आहोत, हे त्यांनी सिद्ध केले आहे. या निवडणुकीच्या प्रचारात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईचे कसे नुकसान केले, हा मुद्दा त्यांनी प्रचारात मांडला. सत्ता पुन्हा हाती दिल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगून आपण हे सर्व थांबवू, असे आश्वासन दिले. ते लोकांना भावले. आता एकहाती सत्ता आल्याने महापालिकाच नव्हे तर सिडकोसह एमआयडीसीत नाईक काय करतात याकडे शहरवासीयांचे लक्ष असेल. यातच पराभूत झालेल्या उमेदवारांकडे काँग्रेस, ठाकरे बंधूंनी सपशेल दुर्लक्ष केल्याची कुजबुज राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. नवी मुंबई महापालिका निवडणुकीत झालेला पराभव तुमचा एकट्याचा नसून, तो सर्वांचा असल्याचे सांगून त्यांचे पुनर्वसन करण्याची ग्वाही भाजपसह शिंदेसेनेने आपल्या पराभूत उमेदवारांना दिली. एवढेच नव्हे तर खा. नरेश म्हस्के यांनी शिंदेसेनेच्या सर्व पराभूतांच्या घरी भेट देऊन त्यांचे सांत्वन केले. भाजपकडून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा पराभव झाला तरी पक्ष त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असे सांगितले. तसेच माजी खा. संजीव नाईक यांनी पराभूतांच्या भेटी घेऊन त्यांचा उत्साह वाढविला. मात्र, दुसरीकडे उद्धवसेना, मनसे, काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादीच्या श्रेष्ठींनी आपापल्या पक्षाच्या पराभूतांची साधी विचारपूस केली नाही. उद्धव ठाकरेंनी केवळ विजेत्यांनाच बोलावले. तर काँग्रेस, राष्ट्रवादीने ढुंकूनही पाहिले नाही. यामुळे कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले का? असा सूर उमटत आहे.

## संपादकीय ......


# देवा तुझे किती सुंदर आकाश!

*कुणी तरी म्हटलंय की, सौंदर्य वस्तूमध्ये नसते, तर ते बघणार्याच्या दृष्टीमध्ये असते. बघणार्याच्या मनःस्थितीवर असते. त्यांच्या रुचीवर असते. परिस्थितीनुसार ते बदलत असते. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर उद्धोसेनजींची दृष्टी आणि दृष्टिकोनही बदललेला दिसतोय. आधी त्यांचा प्रचलित देवांवर विश्वास होता; परंतु प्रचारात असलेल्या देवावर यत्किंचितही नव्हता; पण आता सगळेच देव त्यांना देवासारखे वाटू लागले आहेत. माणसाला देवाची आठवण सुखात येत नाही. दुःखात येते. म्हणून हे देवा मला कायम दुःख दे. म्हणजे तुझी आठवण मला सतत येईल, असे एक भक्त म्हणतो.*

*देवाभाऊंमुळे सगळे तथाकथित लौकिक, अलौकिक देव आता निश्रम झाले आहेत. त्यामुळे जे काही नवसबिवस केले पाहिजेत ते याच देवाचे केले पाहिजेत.सध्या उद्धोसेनजींचे मन सगळ्या देवांकडून परावृत्त झाल्याचे दिसते. म्हणून ते निराशेने नव्हे, तर मोठ्या आशेने म्हणतात, देवाची इच्छा असेल, तर मुंबईचा महापौर शिवसेनेचाच होईल. देवा (भाऊ) लाही खूप आनंद झाला. एका नास्तिकाचे रूपांतर एका आस्तिकामध्ये झाल्यासारखे वाटले. केवढा मोठा करिष्मा! पण, देवाने आपला विवेक प्रयत्नपूर्वक सावरला. आपल्या अनुयायांना सांगितले. नाही! नाही! देवाची इच्छा फिक्स आहे. महापौर हा आपलाच होणार आहे. युतीचाच होणार! बाजूला उभ्या असलेल्या ठाणेकरांना आनंदाची उकळी फुटली. ते मनातल्या मनात म्हणत होते. खरंच शिवसेनेचा महापौर झाला पाहिजे. शिवसेना म्हणजे आपलीच शिवसेना. अंतर्यामी देवा (भाऊ) ते. ठाणेकरांचा भाव त्यांनी ओळखला. ते त्वरित म्हणाले, आता मुंबईचा महापौर हा भाजपचाच होईल.*

*तरीही उद्धोसेनजी आशावादी होते. ठाणेकरांची शिवसेना देवाला डोईजड झाली, तर आपण तयारीत राहायला पाहिजे. पहिली अडीच वर्षे, जर आपल्याला सुटली, तर देवा तुझे किती सुंदर आकाशऽ सुंदर प्रकाश देवा तुझा! देवाचे काही सांगता येत नाही. देवाने दिले तर छप्पर फाडके देतो म्हणतात...*

# बिबट्याने केली गायीसह कुत्र्याची शिकार



### डवरगाव शिवारातील घटना शेतकऱ्यांमध्ये दहशत

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २२वरूड** – तालुक्यातील डवरगावलगत सैदापूर मौजामध्ये डेहणकर यांच्या शेतातील गाय आणि एका कुत्र्याची बिबट्याने शिकार केल्याची घटना उघडकीस आल्यामुळेशेतकरी, शेतमजुरांमध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे. बिबट्याच्या हैदोसामुळे शेतकरी शेतमजूर धास्तावले असून गहू, चणा तसेच संत्रा आंबिया बहार फोडण्यासाठी पाणी ओलीत करावे लागते. यातच अपरात्री शेतात ओलितासाठी जावे रात्रीच्या वीज पुरवठामुळे रात्री लागते. या घटनेमुळे दिवसा रात्री शेतकरी शेती पिकाला ओलीत करण्यास जाणे येणे बंद केले. यामुळे शेतिपिकाचे नुकसान होत आहे. तर दिवसासुद्धा शेतमजूर कामावर येत नसल्याने शेती कामं रखडलेली आहे. वनविभागाने घटनास्थळाचा पंचनामा केला. शेतकरी, शेतमजुरांना रात्री दिवसा शेतात जाताना एकटे जाऊ नये असे आवाहन केले.

# कमिटमेंट





पंधरा दिवसांपूर्वी माझी एक जाहीर घोषणा होती की, प्रिंट आणि सोशल मीडियावर मी राजकारणावर लिहिणार नाही वा बोलणार नाही. निवडणूक पार पडली आणि दुसऱ्याच दिवशी मी कॅमेरासमोर आलो. मला अनेक वाचक आणि दर्शकांनी प्रश्न विचारला होता की, तुम्ही चुप्पी का साधली आहे? खरं तर माझ्याकडे उत्तर नव्हतं असं नाही, मात्र 'मौन' ही सुद्धा संवादाची एक भाषा असते; इथवर तुमची समज विकसित झाली नसेल, तर तुम्ही फक्त 'डाय' करा. तुमच्या पिकलेल्या केसांना तसा काहीच अर्थ नाही.

परवा निवडणूक निकालाच्या दिवशी मी एका चॅनलवर होतो. 'मेटा'चा रिपोर्ट आहे की, माझ्या विश्लेषणाला तब्बल ४० लाख दर्शकांनी पसंती दर्शवली. आजही जगभरातील अमरावतीकर सोशल मीडियाच्या सर्व प्लॅटफॉर्मवर मला 'सर्च' करत आहेत. निवडणुकीला आपण 'लोकशाहीचा उत्सव' म्हणतो, ते उगाच नाही!राजकारणात 'कमिटमेंट' शब्दाला खूप अर्थ आहे. खरं म्हणजे, हा केवळ शब्द नाही, ती एक भावना आहे. माणसाच्या चारित्र्याची ओळख ही त्याच्या कमिटमेंटवरून होते. पक्ष आणि पक्षांशी बांधिलकी वगैरे शब्द आपण वाचत आलो आहोत, ऐकतो सुद्धा! राजकीय नेते मतदारांना आश्वासने देतात, पण त्यात कमिटमेंट नसते. मला अलिकडच्या दोन घटनांचा ओझरता उल्लेख करायचा आहे. विषय सर्वांना माहितीच आहे. माझी गेल्या ३० वर्षांपासून वाचकांशी कमिटमेंट आहे,'ईश्वर साक्ष, जे बोलेन ते खरेच बोलेन...'भाजपचे उत्साही नेते तुषार भारतीय यांचा साईनगर प्रभागातून युवा स्वाभिमानच्या सचिन भेंडे यांनी पराभव केला. निवडणूक म्हटली की हार-जित चालणारच, मात्र या निवडणुकीकडे दोन्ही पक्षांनी केवळ एक 'लढत' म्हणून पाहिले नाही; तर ही एक 'लढाई' झाली. लढाई आणि लढत यात फरक असतो. लढाईत कोणीच ढिलाई दाखवत नाही, सर्व काही तुटेपर्यंत ताणले जाते. 'प्रेमात आणि युद्धात सगळं माफ असतं' या वाक्प्रचाराला 'चुकीला माफी नाही' या वाक्याशी जोडून पहा, तुम्हाला वेगळा अर्थ मिळेल. निवडणूक म्हटली की पेटून उठावे लागते, लोकांना पेटवावे लागते; हे सर्व खरे असले, तरी लोकांना पेटवताना आपले स्वतःचे हात भाजणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागते.तुषार भारतीय यांना पाठिंबा देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या घरी गेले होते. मुख्यमंत्र्यांचा अमरावतीत झालेला रोड शो साईनगरात विसावला. ही निवडणूक भाजपसाठी नव्हे, तर तुषार भारतीय यांच्यासाठी प्रतिष्ठेची बनली होती. निकाल आला आणि तो अगदीच अपेक्षित होता!गेल्या विधानसभा निवडणुकीत रवी राणा यांच्या विरोधात तुषार भारतीय उभे आहेत, असे चित्र रंगवण्यात आले. वास्तवात, त्यांना बसपाच्या उमेदवारापेक्षाही कमी मते मिळाली. अवघ्या ३ हजार मतांवर त्यांची बोळवण झाली, तर राणा १ लाख २७ हजारांचे 'पॅकेज' घेऊन विजयी झाले. त्यामुळे तुषार भारतीय यांच्या उमेदवारीने रवी राणांना एक टक्काही फरक पडला नाही. तरीही राणा आणि तुषार यांच्यात एक संघर्ष निर्माण झाला. 'युवा स्वाभिमान' हा भाजपचा मित्रपक्ष आहे, मात्र बडनेरा विधानसभा मतदारसंघात फक्त 'राणा आणि पाना' असेच चित्र दिसते.रवी राणा यांना तुषार भारतीय यांची कुठेच अडचण होण्याची शक्यता नव्हती. मात्र तुषार यांना बडनेरा विधानसभा मतदारसंघातून निवडून यायचे आहे; त्यामुळे राणांशी थेट भिडलो तर जनता भरभरून आशीर्वाद देईल, असा भाबडा आशावाद तुषार आणि त्यांच्या मित्रांना होता. पण राजकारणात असे होत नसते. जिल्ह्यातील सर्व नेत्यांना राणा दांम्पत्य राजकारणात नको आहे, मात्र मतदारांना ते हवे आहेत; हे सत्य स्वीकारावेच लागेल. काँग्रेसच्या प्रखर नेत्या ड. यशोमती ठाकूर किंवा लोकनेते बच्चू कडू यांचा पराभव हे स्वप्न वाटत असतानाच, मिस्टर अँड मिसेस राणा यांनी या दोन्ही नेत्यांना 'अस्मान' दाखवले. या गोष्टीकडे जनतेचा पाठिंबा आणि कौल या दृष्टीने पाहायला हवे.

तुषार भारतीय महापालिका निवडणुकीत निवडून आले असते का? असा प्रश्न मला अनेकांनी विचारला. मला स्वतःला असे वाटते की, तुषार भारतीय महापालिकेत हवे होते, त्यांचा अमरावतीला फायदा झाला असता. पण त्यांची राजकीय डावपेचाची शैली आणि वेगळाच आक्रमक स्वभाव त्यांना नडला. 'लक्ष्मणाने रामाची भाषा बोलू नये.' कैकेयीने वर मागून भरतासाठी सत्ता मागितली, मात्र भरताला स्वतःच्या क्षमतेची जाणीव होती आणि त्याला लोकांचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. भरत लक्ष्मणाइतकाच बंधूप्रेमी होता, पण तो रामासोबत वनवासात गेला नाही. तो राज्यकर्ता झाला, पण रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवूनच!

रवी राणांनाही मुख्यमंत्र्यांचा आशीर्वाद आहे. नातेसंबंध राजकारणात एका टप्प्यापर्यंतच तग धरतात, मात्र एका सीमेनंतर राजकारणाची एक 'भूक' असते, ती टाळता येत नाही. समंजस लोकांना हा मजकूर समजला असेलच. याचा अर्थ असा नाही की तुषार यांचे सर्वच चुकत आहे.तुषार भारतीय यांची एक बाजू आणि एक भूमिका आहे. जिल्ह्यातील भाजप वाचवण्यासाठी माझी ही धडपड करत आहे, असा त्यांचा दावा आहे. राणा दांम्पत्य बाहेरचे आहे, त्यांना बाहेरचा रस्ता दाखवायला हवा, ही भूमिका काहींना पटू शकते, पण त्यांना 'नवा भाजप' कळलेला नाही हे उघड आहे. 'बेरजेचं राजकारण' म्हणजे काय असतं भाऊ?

रवी राणा यांचा विधानसभेत एकदाही पराभव झाला नाही. सर्वपक्षीय नेत्यांनी लोकसभेत पूर्ण जोर लावून नवनीत राणांचा पराभव घडवून आणला. नवनीत राणा यांच्या दाव्यानुसार, भाजपातील काही मंडळींनी पक्षाशी गद्दारी केली. रवी राणा यांना विधानसभेत महायुतीचा पाठिंबा असतानाही तुषार यांनी पक्षाचा आदेश झुगारून निवडणूक लढवली. त्यावेळची त्यांची विधाने आणि दावे आजही तितकेच मनोरंजक आणि हास्यास्पद वाटतात.

परवा पराभवानंतर तुषार यांच्या घरी 'पराभूतांचा मेळा' भरला. तिथे 'खल'झाला आणि एक 'खलबत्ता' तयार करण्यात आला. भाजप शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे आणि भाजपच्या स्टार प्रचारक नवनीत राणा यांच्यावर पराभवाचे खापर फोडणारा दोन पानांचा 'खलिता'तयार झाला. तिसऱ्या कोऱ्या पानावर २३ लोकांच्या सह्या घेतल्या गेल्या, ज्यात ३ नवनिर्वाचित नगरसेवक व २० पराभूत उमेदवारांचा समावेश होता. हे पत्र तातडीने प्रसारमाध्यमांना पाठवण्यात आले. माझ्याकडेही त्या पत्राची प्रत आली. काही वेळातच माझ्या एका शोचे शूटिंग होते, त्यात मी या विषयाची दुसरी बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. रात्री उशिरा हा शो सोशल मीडियावर व्हायरल झाला. सकाळी उठून पाहिले तर रात्रभरात २५ हजार दर्शकांनी तो पाहिला होता.शो करण्यापूर्वी माझे काही लोकांशी बोलणे झाले होते, तेव्हा त्यांनी कानावर हात ठेवले होते. आमच्या कोऱ्या कागदावर सह्या घेतल्या, अशी निवेदने नंतर समोर आली. दुपारपर्यंत वातावरण तापले आणि स्वाक्षरी करणाऱ्यांपैकी बहुतांश मंडळींनी नवनीत राणा यांनाच विजयाचे श्रेय दिले. पराभूत उमेदवारांनीही नवनीत यांना दोष दिला नाही. जर ही तुषार भारतीय यांची राजकीय खेळी असेल, तर विचार करा,या धडपडीतून नेमके काय साध्य झाले?लोकं,उगवत्या सूर्याला नमस्कार करतात,किती सिंपल थेअरी!

भाजपचे २५ उमेदवार निवडून आले आहेत. चेतन गावंडे वगळता सर्वांनी विजयाचे श्रेय नवनीत राणांना दिले. भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून कोअर कमिटीला धारेवर धरले जात असताना, सर्व नेत्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारायला हवी. मात्र, त्या चौकटीतून नवनीत राणा अलगद बाहेर पडल्या आणि यशाच्या मानकरी ठरल्या.रवी राणा विरोधकांच्या शुल्लक वाटणाऱ्या गोष्टीही गांभीर्याने घेतात आणि योग्य ठिकाणी बोट ठेवतात. नवनीत राणा यांना भाजपातून दूर करा ही मागणी हवेत विरली. उलटपक्षी, ते पत्रच बनावट असून नेत्यांची बदनामी करणारे आहे, म्हणून पत्र निर्मात्याची चौकशी सुरू झाली आहे. पतीराजांच्या 'स्वाभिमानी' पक्षाला सोयीस्कर भूमिका घेणाऱ्या नवनीत भाभींना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याच्या प्रयत्नात तुषार स्वतःच अडकले. कोणीतरी उपरोधाने म्हटलेच लेटरबॉम्ब लावून त्यांनी शहरातून धूम ठोकली!एका चांगल्या नेत्याचा असा अपप्रचार होतो! खाया पिया कुछ नही, गिलास तोडा बारह आना'!!



माधव पांडे
९८२३०२३००३

# आमझरी येथे 'मधाचे गाव' योजनेअंतर्गत आदिवासी महिलांना मधमाशा पालनाचे प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'मधाचे गाव' योजनेअंतर्गत जिल्ह्यातील आमझरी येथील स्थानिक आदिवासी महिलांना सातेरी मधमाशा पालनाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.राज्यात पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेल्या १० गावांमध्ये आमझरीचा समावेश असून, सध्या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथे विविध उपक्रम राबविले जात आहेत.सद्यस्थितीत गावातील




२१ महिलांना प्रशिक्षण दिले जात असून, भविष्यात गावातील प्रत्येक घरातील किमान एका सदस्याला प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासोबतच गावात प्रशिक्षणासह मधपेट्यांचे वाटप, मधुबनाची स्थापना, सामुहिक सुविधा केंद्र आणि माहिती दालनाची निर्मिती करण्यात येत आहे, ज्यामुळे हे गाव मध उत्पादनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास येणार आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी दिली आहे.

# पाय दुखेपर्यंत चालता पण पोट कमीच होईना? वॉकनंतर ५ गोष्टी करा, पटकन बारीक व्हाल

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

निरोगी राहण्यासाठी शरीर एक्टिव्ह असणं खूप महत्वाचं असतं. ज्याप्रमाणे शरीर एनर्जेटीक राहण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते त्याचप्रमाणे वॉक आणि व्यायामाचीही आवश्यकता असते. सकाळी वॉक केल्यानं ताण-तणाव दूर






होतो शरीरात ब्लड सर्क्युलेशनही चांगले राहते इतकंच नाहीतर अनेक आजारांपासूनही बचाव होतो. पण मॉर्निंग वॉक करताना काही चुका केल्यामुळे तुमचे आरोग्यही बिघडू शकते. हेल्थलाईनच्या रिपोर्टनुसार मॉर्निंग वॉकवरून आल्यानंतर काय करायचं, काय नाही ते समजून घ्या.

**पाणी प्या**

सकाळी वॉक करून आल्यानंतर पोटभर पाणी प्या. असं केल्यानं शरीरात डिहायड्रेशनची समस्या उद्भवत नाही. शरीराला थकवा येत नाही. म्हणून वॉक करून आल्यानंतर भरपूर पाणी प्यायला हवं शरीरात पाण्याचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी तुम्ही इलेक्ट्रोलाईट ड्रिंकचा वापर करू शकता.

**स्ट्रेचिंग करा**

सकाळच्या वॉक नंतर आवर्जून स्ट्रेचिंग करायला हवं. यामुळे अनेक समस्यांपासून तुम्हाला सुटका मिळू शकते. मॉर्निंग वॉक केल्यानं आपल्या मांसपेशी गरम होतात. अशा स्थितीत मांसपेशींमध्ये वेदना वाढू शकतात. अशा स्थितीत स्ट्रेचिंग केल्यानं या वेदनांपासून सुटका मिळू शकते याशिवाय शरीर लवचीक राहते.

ओटी पोट लटकतंय-फिगरच बिघडली? सकाळी उठल्यावर १ काम करा-मेणासारखी वितळेल चरबी

**शरीर शांत होऊ द्या**

चालून आल्यानंतर शरीर शांत, थंड ठेवण्याचा प्रयत्न करा. कारण चालण्यामुळे शरीरात उष्णता तयार होते. म्हणून वॉकनंतर काहीवेळ शांत बसायला हवं. जेणेकरून हॉर्ट बीट साधारण होईल आणि थकलेल्या शरीराला आराम करता येईल.

**प्रोटीन शेक प्या**

मॉर्निंग वॉकनंतर शरीराला दुरूस्त करण्यासाठी प्रोटीन शेक पिणं खूप महत्वाचे असते. मॉर्निंग वॉकमुळे शरीरात पाण्याची कमतरता होत नाही आणि शरीरात एनर्जी टिकून राहते. जेव्हाही तुम्ही मॉर्निंग वॉक करून येता तेव्हा प्रोटीन शेक किंवा केळीचे सेवन करा. यामुळे फक्त मांसपेशी मजबूत होत नाही तर शरीराला आवश्यक असणारे व्हिटामीन्सही मिळतात.

**हंगामी फळं खा**

सकाळी चालल्यानंतर हंगामी फळांचे सेवन करा. असं केल्यानं शरीराला ऊर्जा मिळते आणि अनेक प्रकारचे व्हिटामीन्स, मिनरल्सही मिळतात. अधिक वॉक केल्यानं ऊर्जा कमी होते अशावेळी फळांचे सेवन केल्यानं शरीराला ऊर्जा मिळण्यास मदत होते.

# पहिल्यांदा आंबा बाग लावताय, डब्बल उत्पन्नासाठी ही आंतरपीके लागवड करा!

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

नवीन आंबा बागेत सुरुवातीच्या वर्षांत उत्पन्न मिळवण्यासाठी आणि जमीन सुपीक ठेवण्यासाठी आंतरपिके घेऊ शकता, ज्यामुळे सुरुवातीच्या वर्षांतील खर्च भागवून जमिनीचा कस वाढवता येतो आणि तापमान नियंत्रित राहते.




यामध्ये भाजीपाला (उदा. भोपळा, टरबूज), शेंगवर्गीय पिके (उदा. ताग), औषधी वनस्पती (उदा. तुळस, कोथिंबीर) आणि कमी उंचीची फळझाडे (उदा. ड्रॅगन फ्रूट, अननस) यांसारखी पिके घेता येतात.

नवीन बागेमध्ये आंतरपीक बागेमध्ये कमी उंचीचे आंतरपीक घ्यावे.

खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामात आंतरपीक पद्धती ठरवताना जमिनीची सुपीकता देखील जपली जाईल, हे विचारात घ्यावे.

पावसाळा किंवा हिवाळ्याच्या हंगामात आंतरपीक घेतले नाही तरी चालेल.

परंतु, उन्हाळ्यात आपल्या शेतामध्ये कमी उंचीचे आंतरपीक घेण्याचा प्रयत्न करावा.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

आंतरपिकामुळे बागेत कलमांच्या मुळांभोवती सावली, गारवा राहून एकंदरीत तापमान कमी राहण्यास मदत होते.

तसेच हवेतील आर्द्रता वाढून झाडांच्या जोमदार वाढीस याचा निश्चितच फायदा होतो.

बागेमध्ये आंतरपीक घेतले असल्यास, आंब्याच्या कलमांना आंतरमशागत करताना इजा होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

आंतरपिकांची निवड कशी करावी:

कमी उंचीची पिके : आंब्याच्या झाडांच्या वाढीमध्ये अडथळा आणणार नाहीत अशी, कमी उंचीची पिके निवडा.

शेतजमिनीचा प्रकार : तुमच्या मातीच्या सुपीकतेनुसार पिकांची निवड करा, जेणेकरून मातीचा कस टिकून राहील.

पिकांची पद्धत : खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामांसाठी योग्य पिकांची निवड करा.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

## वीस जागा कमी मिळूनही भाजपला मतांच्या फाटाफुटीचा फायदा, सर्वाधिक १९.७५ टक्के मते

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती–** महापालिकेच्या गेल्या निवडणुकीपेक्षा २० जागा कमी मिळूनही २५ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपला १९.७५ टक्के मते मिळाली आहेत. काँग्रेसला १६.८२ टक्के, राष्ट्रवादी अजित पवार गटाला १६.६१ टक्के, शिवसेना शिंदे गटाला ७.१७ टक्के, बसप ३.८८ टक्के, शिवसेना ठाकरे गटाला ३.३३ टक्के तर राष्ट्रवादी शरद पवार गटाला केवळ ०.६० टक्के मते मिळाली आहेत. भाजपचा मित्रपक्ष म्हणून वावरणाऱ्या युवा स्वाभिमान पक्षाने स्वतंत्र लढूनही १० टक्क्यांच्यावर मते प्राप्त केली आहेत.

महापालिकेकडून मतमोजणीनंतरची अंतिम आकडेवारी निश्चित करण्यात आली असून त्यातून ही माहिती समोर आली आहे. एकूण २२ प्रभागांतील ८७ जागांसाठी गेल्या १५ जानेवारीला मतदान झाले. त्यामध्ये अ,ब,क आणि ड अशा प्रत्येक जागेसाठी सुमारे ३ लाख ६३ हजार मतदारांनी (५३.६५ टक्के) मतदानाचा हक्क बजावला होता. मतदारांना प्रत्येकी ४ मते द्यायची होती. त्यानुसार एकूण १४ लाख ६० हजार ९९० इतके मतदान झाले. त्यात २ लाख ८८ हजार ४९० मते मिळवून भाजपने आपला जनाधार टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र १९.७५ टक्के ही आकडेवारी पाहता महापालिकेवर एकतर्फी वर्चस्व गाजवण्यात भाजपला अपेक्षित यश आलेले दिसत नाही. मोठ्या प्रमाणात झालेले मतविभाजन हे भाजपच्या चिंतेत भर टाकणारे आहे.

**विभाजनामुळे मतांमध्येही अंतर**

राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर अमरावतीत अजित पवार गटाने मुसंडी मारली आहे. २ लाख ४२ हजार ६७७ मते घेत अजित पवार गटाने शरद पवार गटाला (अवघी ८ हजार ७३० मते) मोठ्या फरकाने मागे टाकले आहे. दुसरीकडे, काँग्रेसने २ लाख ४५ हजार ७५६ (१६.८२ टक्के) मते मिळवून आपला पारंपरिक मतदार टिकवून ठेवला आहे.

शिवसेनेच्या दोन गटांमध्येही मोठी तफावत दिसून येते. शिंदे गटाने ७.१७ टक्के मतांसह आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला असताना, ठाकरे गटाला केवळ ३.३३ टक्क्यांवर समाधान मानावे लागले आहे. यावेळी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत पण अमान्यताप्राप्त पक्षांना २ लाख ४३ हजार १९६ म्हणजे १६.६५ टक्के मते प्राप्त झाली असून त्यात युवा स्वाभिमान पक्षाचा समावेश आहे. मान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्षांना (एआयएमआयएम आणि इतर) ९.१७ टक्के, तर अपक्षांना ३.७६ टक्के मते मिळाली आहे. १.८६ टक्के लोकांनी 'नोटा'ला पसंती दिली आहे.



## मतं बदलली पण निर्णय कुठे ठरला?

### अंजनगाव सुर्जीत 'अदृश्य हातां'ची चर्चा

चेतन घोगरे

दि.२२अंजनगाव सुर्जी




**पत्रकार परिषद पण स्थानिक नेतृत्व अनुपस्थित**

या संपूर्ण प्रकरणावर पक्ष नेतृत्वाने पत्रकार परिषद घेतली, मात्र एकही स्थानिक पदाधिकारी उपस्थित नव्हता. यामुळे निर्णय स्थानिक नव्हता या चर्चेला बळ मिळत आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, स्थानिक नेतृत्व बाजूला ठेवून काही निवडक लोकांनी सूत्रे हाती घेतली असावीत, अशी शंका व्यक्त होत आहे.

उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत अचानक बदललेली गणितं, शेवटच्या क्षणी फिरलेली मतं आणि निवडणुकीनंतर निर्माण झालेली शांतता–या सगळ्यामुळे अंजनगाव सुर्जीच्या राजकारणात एकच प्रश्न ऐकू येतोय :हा निर्णय सभागृहात झाला की कुठेतरी बाहेर?

दिनांक १६ रोजी पार पडलेल्या निवडणुकीत शिवसेना (उबाठा) गटातील सहा नगरसेवकांनी भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा दिला. हा निर्णय अचानक घेतला गेला, असे सांगितले जात असले तरी, प्रत्यक्षात घडामोडी निवडणुकीच्या अनेक तास आधी सुरू झाल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे.निवडणुकीपूर्वी हालचाली वाढल्यानिवडणुकीच्या आदल्या रात्री काही नगरसेवकांची अनौपचारिक भेटीगाठी, अचानक बंद झालेले मोबाईल फोन आणि सकाळी एकाच दिशेने झालेली मतांची हालचाल–या बाबी आजही चर्चेचा विषय ठरत आहेत.मतदानाच्या आधीच निकाल ठरलेला होता, असे सांगणारे अनेक राजकीय जाणकार उघडपणे बोलत नसले, तरी खासगीत त्यांची शंका ठळक आहे.निवडणुकीनंतरचे मौन बोलकेनिवडणूक संपल्यानंतर संबंधित नगरसेवकांनी माध्यमांपासून अंतर ठेवणे पसंत केले. काहींचे अचानक शहराबाहेर जाणे, तर काहींचे पूर्ण मौन, यामुळे संशय अधिक गडद झाला आहे.विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या निर्णयानंतरही कुठल्याही बाजूने ठोस स्पष्टीकरण पुढे आलेले नाही.

देवाणघेवाण की सत्तेची हमी?(बोल्ड करणे)सामान्य नागरिकांमध्ये केवळ पैशांचीच नाही, तर पुढील काळातील सत्तास्थाने, समित्यांची पदे आणि भविष्यातील राजकीय संरक्षण याबाबतही चर्चा रंगत आहे.फक्त आजचा उपनगराध्यक्ष नाही, तर उद्याच्या समीकरणांची बीजं या निवडणुकीत रोवली गेली, असे मत राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.प्रश्न अनेक उत्तर शून्य

सहा नगरसेवकांचा निर्णय एकाच वेळी कसा बदलला?कोणाच्या मध्यस्थीने हा राजकीय पूल बांधला गेला?निर्णय बदलण्यामागे दबाव होता की प्रलोभन?आणि सर्वात महत्त्वाचे, या 'समझोत्याचा' लाभ नेमका कोणाला?या प्रश्नांची उत्तरे सध्या कुणाकडेही नाहीत. मात्र, एक गोष्ट निश्चित आहेउपनगराध्यक्ष पदाची ही निवडणूक केवळ पदापुरती मर्यादित न राहता, अंजनगाव सुर्जीच्या राजकारणातील अदृश्य शक्तींचे अस्तित्व उघड करणारी ठरली आहे.

## रिद्धी ज्वेलर्स घोटाळा : शेकडो महिलांचा नांदगाव पोलीस ठाण्यावर मोर्चा

### २० कोटींहून अधिक रोख रक्कम व कोट्यवधींचे सोने हडप केल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२नांदगाव पेठ –**




येथील रिद्धी ज्वेलर्स या सराफा व्यावसायिकाकडे गहाण ठेवलेले सोने, दागिने तसेच रोख रक्कम परत न मिळाल्याने संतप्त झालेल्या शेकडो महिलांनी व पीडित नागरिकांनी आज थेट नांदगाव पोलीस ठाण्यावर धडक देत आरोपी सतीशचंद्र बहाड याच्यावर गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी केली. या घटनेमुळे पोलीस ठाण्याला काही काळ छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते.एका आठवड्यापूर्वी सुद्धा काही नागरिकांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली होती आणि हा गंभीर प्रकार उघडकीस आला होता. प्राप्त माहितीनुसार, रिद्धी ज्वेलर्सकडे अनेक नागरिकांनी सोने गहाण ठेवले होते, काहींनी दागिने बनवण्यासाठी सोने दिले होते तर काहींनी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जमा केली होती. मात्र अचानक दुकान बंद करून आरोपी सतीशचंद्र बहाड हा फरार झाला होता, त्याने सुमारे २० कोटी रुपयांहून अधिक रोख रक्कम तसेच कोट्यवधी रुपयांचे सोने हडप केल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे.या प्रकरणात महिला, शेतकरी, मजूर, व्यापारी अशा विविध स्तरातील नागरिकांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. काही महिलांनी आपल्या संसारातील सर्व दागिने गहाण ठेवले होते, तर काहींनी मुलींच्या लग्नासाठी, घरबांधणीसाठी अथवा वैद्यकीय खर्चासाठी पैसे जमा केले होते.

आज हे सर्वजण आर्थिक संकटात सापडले आहेत त्यामुळे आज महिला वर्गानी नांदगाव पेठ पोलीस स्टेशनवर मोर्चा काढून आरोपीला अटक करण्याची तसेच आमचे सोने, दागिने व पैसे परत करण्याची मागणी केली आहे.

आज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारींमध्ये महिलांनी ठेवलेले सोन्याचे गहाण दागिने, चांदीचे दागिने, लाखो रुपयांची रोख रक्कम, बनवण्यासाठी दिलेले दागिने व पूर्ण पैसे भरलेले व्यवहार यांचा समावेश आहे.

**तपासाअंती गुन्हा दाखल करू**

आरोपीविरुद्ध सबळ पुरावे जमा करण्यात आले आहेत. दोन वेगवेगळ्या तक्रारीमधून शंभर पेक्षा अधिक नागरिकांच्या तक्रारी व मुद्देमालांची माहिती घेण्यात आली असून तपासाअंती आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात येईल. – **दिनेश दहातोंडे** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो स्टे. नांदगाव पेठ

बाधितांची संख्या वाढण्याची शक्यता असून, हा घोटाळा अमरावती जिल्ह्यातील आतापर्यंतचा मोठा सराफ फसवणूक प्रकरण ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

संतप्त महिलांनी व नागरिकांनी आरोपीला तात्काळ अटक करून आमचा मुद्देमाल परत मिळवून देण्याची मागणी केली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना शांततेचे आवाहन करत लवकरच गुन्हा दाखल करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.यावेळी मंदाबाई इंगळे,शुभांगी जवके,साधना मोशें, निखील पावडे,गंगुबाई मांडवकर,मारोतीभाऊ शिंदे,अनिल शिंदे,सुरेश शिंदे,पंचफुला सावंत,साईनाथ शिंदे,लखन सावंत,शीलाबाई कुकडे,संगीता सोळंके,अनामिका धोंडे,फैजान खान यांच्या सह असंख्य महिला, पुरुष,व्यावसायिक यांचा मोर्चात सहभाग होता.

## महापालिकेत शिंदे सेनेचा स्वतंत्र गट स्थापन डॉ. राजेंद्र तायडे गटनेते

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती** – अमरावती महानगरपालिका सभागृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे तीन नगरसेवक निवडून आले आहेत. या नगरसेवकांनी कोणत्याही राजकीय आघाडीत सहभागी न होता स्वतंत्र –गट म्हणून कार्य करण्याचा निर्णय घेतला असून, त्याबाबतचा



दावाविभागीय आयुक्तांकडे मान्यतेसाठी सादर केला आहे. सुतगिरणी–सामरा नगर येथील प्रभाग क्रमांक २० मधून निवडून आलेले नगरसेवक डॉ. राजेंद्र तायडे यांची शिंदे सेनेच्या गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेच्या सभागृहात तीन सदस्यीय शिंदे सेनेच्या गटाचे नेतृत्व डॉ. तायडे करणार आहेत. महापालिकेत शिंदे सेनेचे एकूण तीन नगरसेवक निवडून आले असून, स्वतंत्र गट म्हणून सर्व आवश्यक निर्णय घेतले जातील, असे पक्षाकडून स्पष्टकरण्यात आले आहे. शिंदे सेनेच्या नगरसेवकांना स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्याबाबत तसेच डॉ. राजेंद्र तायडे यांची गटनेते म्हणून नियुक्ती स्वीकारण्याबाबतचे अधिकृत पत्र पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष बद्रे यांनी जारी केले आहे.

## प्रहार जनशक्ती पक्षातर्फे शंकरपट शर्यतीचा थरार: शंकरपटाची धुळवळ

### ११ लक्ष रुपयाच्या बक्षिसांची लयलूट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२बहिरम–** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चु कडु यांनी बहिरम यात्रेतील तमाशा फड सारख्या कुप्रथांना हद्दपार केले. तेव्हापासून सातपुडाच्या पायथ्याशी भरत असलेल्या बहिरम यात्रा परिसरामध्ये दरवर्षी शंकर पट आयोजन करण्यात येते. यावर्षीही २२ ते २४ जानेवारी दरम्यान सलग ३ दिवस विदर्भ केसरी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये ११ लक्ष रुपयाच्या बक्षिसांची लयलुट होणार आहे. या बैल जोडीच्या शर्यतीत अमरावती जिल्हासह इतर जिल्हा व शेजारच्या राज्यातील बैलजोड्या शर्यती साठी मोठ्या प्रमाणात सहभागी होणार



आहे ३ गटात होणार्या यात शर्यतील एकूण ११ लक्ष रुपयाची बक्षीस जाहीर करण्यात आली आहे. तर धुरकरी सन्मान बक्षिसाच्या निर्धारित केलेले केलेले रोख बक्षिसे सुद्धा देण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये अचूक मिनिट व सेकंद सांगण्याचे काम म्हणजे घड्याळाची जबाबदारी हिंगोलीचे राजु मंडाळे व इतर सहकारी सांभाळणार आहे. विदर्भ केसरी शंकरपट स्पर्धेचे उद्घाटन हे चांदूरबाजार नवनिर्वाचित नगराध्यक्ष मनीषा नागलीया, शल्य चिकीत्सक डॉ. प्रभु जवंजाळ, अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, चांदूरबाजार तहसीलदार सोनल सूर्यवंशी, शिरजगाव कसबा पोलीस स्टेशन ठाणेदार महेंद्र गवई, चांदूरबाजार पंचायत समिती गटविकास अधिकारी डॉ.निलेश वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उद्घाटन सोहळा होणार आहे. बक्षिस वितरण सोहळ्याला माजी राज्यमंत्री बच्चु कडू तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे.

## मेळघाटात बनावट ऑडिटचा घोटाळा उघड; कूप वाटपात संगनमताचा संशय, कोट्यवधींच्या फसवणुकीची चौकशी सुरू

### वन व सहकार प्रशासनात खळबळ, गुन्हे दाखल होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२धारणी** मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील 'कूप' वाटप प्रक्रियेत गंभीर स्वरूपाचा भ्रष्टाचार समोर आला असून, बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सहकारी संस्थांकडून चक्क बनावट लेखापरीक्षण अहवाल आणि खोट्या ऑडिट पावत्या सादर करून कूपकामांचे वाटप मिळवण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण वन व सहकार प्रशासनाची विश्वासार्हता प्रश्नचिन्हाखाली आली असून, दोषींवर तात्काळ फौजदारी कारवाईची मागणी जोर धरत आहे.मेळघाट वन विभाग, परतवाडा अंतर्गत सन २०२४–२५ या आर्थिक वर्षासाठी कूपकामांचे वाटप करण्यात आले. नियमानुसार, या कामांसाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक सहकारी संस्थेने मागील आर्थिक वर्षाचा वैध, प्रमाणित आणि पूर्ण झालेला लेखापरीक्षण (ऑडिट) अहवाल सादर करणे अनिवार्य असते. मात्र, आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्यादित, तारुबांदा येथील संस्थेच्या बाबतीत हा नियम पायदळी तुडवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.तारुबांदा संस्थेचे सचिव गोलू मुंडे यांनी सन २०२३–२४ या वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्याचे भासवून, प्रमाणित लेखापरीक्षक आर. आर. नागतोडे यांच्या नावाने बनावट ऑडिट अहवाल तयार केल्याचा आरोप आहे. एवढ्यावरच न थांबता,



८,५०० रुपये ऑडिट फी भरल्याची खोटी पावतीही अर्जासोबत जोडण्यात आल्याचे समोर आले आहे. या बनावट कागदपत्रांच्या आधारे संस्थेला कूपकामांचे वाटप मिळाल्याचा संशय व्यक्त केला जात असून, यामध्ये संगनमताने कारभार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.या संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश लेखापरीक्षक आर. आर. नागतोडे यांच्या अधिकृत पत्रामुळे झाला. त्यांनी जिल्हा उपनिबंधकांना दिलेल्या पत्रात संबंधित संस्थेचे कोणतेही लेखापरीक्षण आपण केलेले नसून, आपल्या नावाने सादर करण्यात आलेला अहवाल व पावती पूर्णतः बनावट असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच, माहिती अधिकारांतर्गत (आरटीआय) विशेष लेखापरीक्षक कार्यालयानेही तारुबांदा संस्थेचे लेखापरीक्षण अद्याप अपूर्ण असल्याची माहिती दिली आहे. ही बाब अत्यंत गंभीर मानली जात असून, बनावटपणाचे ठोस पुरावे प्रशासनापुढे आले आहेत.या प्रकरणी जिल्हा सहनिबंधक तथा माजी सचिव जी. एस. जाधव यांनी जिल्हा उपनिबंधक, वन विभाग, व्याघ्र विभाग तसेच संबंधित यंत्रणांकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. सहकारी संस्थांच्या क्षेत्र अधिकारी कार्यालयांमध्ये सुरू असलेला हा बनावट कारभार म्हणजे शासनाची उघड फसवणूक असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. दोषीवर तात्काळ गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करावी, अशी ठोस मागणीही करण्यात आली आहे.मात्र, बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक झाल्याचे स्पष्ट असतानाही संबंधित सचिवावर अद्याप कोणतीही कठोर कारवाई झालेली नसल्याने संशय अधिक बळावत आहे. यामागे जिल्हा जंगल कामगार संघ आणि वन विभागातील काही उच्च अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याचा आरोप होत असून, कारवाई टाळली जात असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून सुनावणी निश्चित करण्यात आल्याची माहिती जिल्हा विशेष लेखापरीक्षक, अमरावतीचे जगदीश गवळे यांनी दिली आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर सर्व अहवाल जिल्हा उपनिबंधकांकडे सादर करून कायदेशीर कारवाई निश्चित करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तथापि, चौकशीच्या नावाखाली वेळकाढूपणा होणार नाही ना, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या घोटाळ्याबाबत मेळघाटचे आमदार केदाराम काळे यांच्याकडेही तक्रार करण्यात आली असून, त्यांनी या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे. शासनाची फसवणूक, बनावट दस्तऐवजांचा वापर आणि संगनमताच्या आरोपांमुळे हा प्रकार केवळ प्रशासकीय चूक न राहता गंभीर फौजदारी गुन्ह्याच्या कक्षेत येतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.मेळघाटसारख्या संवेदनशील व्याघ्र प्रकल्पात कूपकामांसाठी निधी आणि कामांचे वाटप पारदर्शक असणे अत्यावश्यक आहे. मात्र, बनावट ऑडिट अहवालांच्या आधारे कामे मिळत असतील, तर हा केवळ आर्थिक घोटाळा नसून वनसंवर्धन, आदिवासींचे हक्क आणि सार्वजनिक विश्वास यांवरही घाला आहे. त्यामुळे दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल होऊन कठोर कारवाई होते का, की प्रकरण फाइलांपुरतेच मर्यादित राहते, हे पाहणे आता म्हत्वाचे ठरणार आहे.

# राख वाहून नेणाऱ्या सातशे वाहनांची चाके थांबली

## रतन इंडियाच्या व्यवसायविरोधी धोरणाविरुद्ध तीन दिवसांपासून ठिय्या आंदोलन

### शासन निर्णयाविरुद्ध राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया थांबवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नांदगाव पेठ**

रतन इंडिया पॉवर लिमिटेडच्या व्यवसायविरोधी धोरणामुळे परिसरातील लघु व सूक्ष्म उद्योजक आणि वाहनधारक संतप्त झाले असून गेल्या तीन दिवसांपासून ठिय्या आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामुळे राख वाहतूक करणाऱ्या सुमारे ७०० वाहनांची चाके पूर्णपणे थांबली असून प्रकल्पातील दैनंदिन वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे.रतन इंडिया पॉवर प्रकल्पातून लघु व सूक्ष्म उद्योगांना राख पुरवठ्यासाठी दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र ही प्रक्रिया शासन निर्णय दिनांक ०९ ऑगस्ट २०२४ च्या मार्गदर्शक तत्त्वांच्या विरोधात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने दिनांक ९ ऑगस्ट २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार राख विक्रीसाठी टेंडर प्रक्रिया कशी राबवावी याबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत. मात्र रतन इंडिया पॉवर लिमिटेडने या मार्गदर्शक तत्त्वांकडे दुर्लक्ष करून लघु व सूक्ष्म उद्योजकांवर अवाजवी व जाचक अटी लादत निविदा प्रक्रिया राबविल्याचा आरोप अंबाई ब्रिक्स व ट्रान्सपोर्ट असोसिएशनने केला आहे.निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी लघु व सूक्ष्म उद्योजकांकडून दोन कोटी रुपयांचा नफा-तोटा बॅलन्स शीट मागविण्यात आली असून, ही अट लघु उद्योगांसाठी अशक्य असल्याने त्यांना थेट निविदा प्रक्रियेबाहेर ठेवण्यात आले असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय राखेची किमान किंमत ५० रुपये प्रती मेट्रिक टन निश्चित करण्यात आली असून ती पूर्णतः चुकीची व नियमबाह्य असल्याचा दावा करण्यात आला आहे.

सध्या कंपनीकडून ५० मेट्रिक टन राख वाहतुकीसाठी एका वाहनामागे ३०० रुपये आकारले जात असून, त्या हिशोबाने



राखेची मूळ किंमत प्रतिटन सुमारे ३ रुपये ५० पैसे इतकी आकारायला हवी होती मात्र प्रत्यक्षातकिमान दर थेट ५० रुपये प्रती टन ठेवणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.या संपूर्ण प्रक्रियेवरून लघु व सूक्ष्म उद्योजकांना राख कमी दरात मिळू नये आणि खुल्या लिलाव पद्धतीतून जास्त दराने विक्री करण्याचा कंपनीचा उद्देश स्पष्ट होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. खुल्या प्रवर्गातील निविदेमध्ये बोली वाढत गेल्याने राखेचा दर तब्बल १२० रुपये प्रती मेट्रिक टनपर्यंत नेण्यात आला असून, पुढे बोलीप्रमाणे दर वाढवून राख खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याचे सांगण्यात आले. या धोरणामुळे जिल्ह्यातील शेकडो लघु व सूक्ष्म उद्योजकांसह सुमारे ७०० वाहनधारकांवर उद्योग बंद करण्याची वेळ येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे सदर टेंडर प्रक्रिया तात्काळ रद्द करून शासन निर्णयानुसार नव्याने, पारदर्शक पद्धतीने निविदा राबवावी, अशी मागणी अंबाई ब्रिक्स व ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करून कंपनीची कोळसा वाहतूक करणारी रेल्वे रोखण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या उपोषणाला अंबाई ब्रिक्स व ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे बलविर चव्हाण, राजू चिरडे,सागर अंबडकार,मयूर दारोकार, अजय मोरवाल, मोरेश्वर इंगळे, सुरज बैस,सतीश तायडे,साजिद बडनेर वाले,कमरुद्दीन नजरुद्दीन सय्यद ( कम्मू ),अनिल भूतकर,किशोर अंबाडकर,श्रीकांत सरोदे, प्रणय मेहरे,सागर खराटे, पवन रावत,निखिल तायडे, जुनेद खान यांचेसह शेकडो वाहन मालक तसेच व्यावसायिक आदी उपस्थित असून जोपर्यंत ही निविदा प्रक्रिया थांबवून नव्याने निविदा राबविण्यात येत नाही तोपर्यंत आमचा लढा सुरूच असणार असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

# श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानची धारातीर्थ गडकोट मोहीम अमरावतीहून १००० धारकऱ्यांसह विशेष ट्रेन दिमाखात रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

तरुणाईला छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालण्याची प्रेरणा देत, व्यसनमुक्त व राष्ट्रनिष्ठ पिढी घडविण्याच्या उद्देशाने श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने आयोजित धारातीर्थ गडकोट मोहिमेसाठी आज दुपारी १२ वाजता अमरावती रेल्वे स्थानकावरून १००० धारकऱ्यांसह विशेष ट्रेन मोठ्या उत्साहात रवाना झाली. विदर्भाच्या विविध भागांतून धारकरी अमरावतीत दाखल झाल्याने रेल्वे स्थानकावर



शिवमय वातावरण निर्माण झाले होते.या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे विधीवत पूजन भाजपा नेत्या व खासदार मा. नवनीत ताई राणा, ज्येष्ठ विधिज्ञ श्री. प्रशांत देशपांडे, नगरसेविका ड. प्रीती हर्षल रेवणे, नगरसेविका नंदा सावदे व नगरसेविका सुनीता लोणारे यांच्या हस्ते करण्यात आले. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे विभागप्रमुख श्री. निशादसिंह जोध यांनी धारकऱ्यांना शिस्त, संयम व सुरक्षिततेचे पालन करण्याचे मार्गदर्शन केले.खासदार नवनीत ताई राणा यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक करत, समाजहितासाठी निस्वार्थपणे कार्य करणारी ही चळवळ शिवछत्रपतींचे हिंदुत्व, शौर्य व राष्ट्रभक्ती तरुणांपर्यंत पोहोचवत असल्याचे सांगितले. तर ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत देशपांडे यांनी संघटनेला सदैव पाठबळ देण्याचा विश्वास व्यक्त केला.आदरणीय संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या चार दिवसांच्या मोहिमेत धारकरी लोहगड ते भीमगड हा ऐतिहासिक पल्ला पायी पूर्ण करणार आहेत. स्वतःचे अन्नसामान सोबत ठेवून, खुल्या आकाशाखाली मुक्काम करत शिवछत्रपतींच्या मार्गाचा अनुभव घेणे हा मोहिमेचा विशेष आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर प्रमुख कर्ण धोटे यांनी केले. विशेष ट्रेनच्या आयोजनासाठी स्टेशन मास्टर लोहकरे यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

# शिवसेनेचे सहा नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीस पाठवणार : सुधीर सुर्यवंशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अंजनगाव सुर्जी**

येथील विश्राम गृह येथे शिवसेनेचे उपनेते सुधीर सुर्यवंशी यांनी मोठी घोषणा करत पक्षातून फुटलेल्या सहा नगरसेवकांवर कडक कारवाईचा इशारा दिला आहे. दि. १६ रोजी पार पडलेल्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराला शिवसेनेच्या उबाठा गटातील सहा नगरसेवकांनी पाठिंबा दिल्याने संपूर्ण शहरासह जिल्हाभरात मोठी चर्चा रंगत आहे. याच पार्श्वभूमीवर अंजनगाव सुर्जी येथे शासकीय विश्रामगृहात शिवसेना उपनेते सुधीर सुर्यवंशी यांनी पत्रकार परिषद घेऊन यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

**कायदेशीर कारवाईचा इशारा–** पत्रकारांशी बोलताना सुधीर सुर्यवंशी म्हणाले की, जे नगरसेवक भाजपसोबत गेले आहेत, त्यांना कायदेशीर कारणे दाखवानोटीस पाठवली जाईल आणि पक्षविरोधी कारवाईबाबत कठोर निर्णय घेतला जाईल.अक्षय गवळी यांच्या आरोपांवर प्रत्युत्तर यावेळी त्यांनी अक्षय गवळी यांनी केलेल्या आरोपांना निरर्थक ठरवले. ते म्हणाले, अक्षय गवळी हे निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांना शिवसेनेची तिकीट देण्यात आली होती. निवडणुकीतील पराभवानंतर त्यांनी स्वीकृत नगरसेवक पदासाठी जो अर्ज भरला, पण पंकज मोदी प्रकरणावर



भूमिका तसेच दुसरे निष्ठावंत शिवसैनिक पंकज मोदी यांना स्वीकृत नगरसेवक पद देण्यात आल्यामुळे कोणी नाराज झाले असतील, तर ती नाराजी संवादातून दूर केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.मागील निवडणुकीत पंकज मोदी दुसऱ्या क्रमांकावर होते, त्यामुळे त्यांना पक्षाने थांबवून ठेवले होते, स्विकृत नगरसेवक पदासाठी सांगितले होते. अशी माहितीही यावेळी देण्यात आली. शेवटचा इशारा सुधीर सुर्यवंशी यांनी सांगितले की, पक्षातून फुटलेल्या सहा नगरसेवकांवर कायदेशीर कारवाई निश्चित केली जाईल. शिवसेनेची शिस्त आणि निष्ठा अबाधित ठेवण्यासाठी पक्ष कोणतीही तडजोड करणार नाही. त्यांनी जनतेचा विश्वासघात केला आहे. असे सुध्दा त्यांनी सांगितले.

पक्षाने गटनेता सुयोग खाडे असताना आमचे उबाठाचे सहा फुटल्याने आम्ही सुयोग खाडे ला उपनगराध्यक्ष पदासाठी आम्ही काँग्रेसचा पाठिंबा घेतला होता. पण अर्ज भरायला लावले. पण सामान्य नागरिकांमध्ये चर्चा रंगत आहे की यात मोठा प्रमाणात देवाणघेवाण झाल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात रंगत आहे. पण सर्व घडामोडीचा मुख्य सूत्रधार कोण? हे अद्यापही गुलदस्त्यातच आहे.

उपनेते सुधीर सूर्यवंशी यांच्या पत्रकार परिषदेला पदाधिकाऱ्याने दाखवली पाठ(बोल्ड करणे)उपनगराध्यक्ष निवडणुकी घडलेल्या प्रकारावर येथील विश्रामगृहात शिवसेना उबाठा चे उपनेते सुधीर सूर्यवंशी यांच्या पत्रकार परिषदेला आमदार गजानन लवटे सह इतरही प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती नव्हती त्यामुळे येथील पदाधिकाऱ्यांनी सुधीर सूर्यवंशी यांच्या पत्रकार परिषदेवर पाठ फिरवली असे निदर्शनात आले.

# मानसिक रुग्णाच्या हल्ल्यात २ ठार, एक गंभीर

## नागरिकांनी चोप देत मनोरुग्णाला बांधून केले पोलिसांच्या हवाली

### आर्वीच्या इंदिरा चौकातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२आर्वी,** शहरातील इंदिरा चौक परिसरातील भाजी बाजारात बुधवार २१ रोजी सकाळी अंगावर शहारे उभे करेल अशी रतरंजित घटना घडली. चशपींरश्र रिींळशपीं रींरलज्ञी मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या २२ वर्षीय तरुणाने लाकडी पाटीने थेट तिघांवर हल्ला करून दोघांना ठार केले. एक व्यती गंभीर जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रथमेश गजानन लाडके ऊर्फ मत्या, रा. नेताजी वार्ड, आर्वी असे आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रथमेश हा मानसिकदृष्ट्या आजारी आहे. बुधवारी सकाळी त्याने त्याच्या आजीशी वाद घालून तिचा



गळा आवळून ठार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांनी आरडा-ओरड केल्यानंतर त्याने तेथून पळ काढला. त्यानंतर सकाळी ८ वाजताच्या सुमारास तो नग्नावस्थेत नेताजी वार्ड येथील राजू गुप्ता यांच्या घराजवळ पोहोचला. तिथे अंगणात खेळत असलेल्या गुप्ता यांच्या ८ वर्षीय चिमुकलीचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. ही बाब लक्षात येताच गुप्ता कुटुंबीयांनी आरडा-ओरड केली असता मुलीला वाचविण्यासाठी काही व्यती धावून गेले. यावेळी प्रथमेशने एकावर हल्ला करून जखमी केले. कशीबशी मुलगी आरोपीच्या तावडीतून सुटल्यावर आरोपीने तेथून पळ काढला.

त्यानंतर प्रथमेश हा हातात लाकडी पाटी घेऊन इंदिरा चौकात गभने यांच्या घराजवळ पोहोचला. त्याने याच परिसरातून जात असलेल्या रामकृष्ण श्रावण राऊत (७०), रा. हनुमान वार्ड यांच्या डोयावर पाटीने वार केला. डोयाला गंभीर दुखापत झाल्याने राऊत यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यानंतर इंदिरा चौकातील भाजी मार्केटमध्ये रामराव महादेव वांगे (८५), रा. मारुती वार्ड यांच्यावर हल्ला केला. ते आपल्या शेतमालाची विक्री करण्यासाठी बाजारात आले होते. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. दोघांनाही रुग्णवाहिकेद्वारे उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. रामकृष्ण राऊत यांना डॉटरांनी मृत घोषित केले. तर रामराव वांगे यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचारादरम्यान रामराव वांगे यांचाही मृत्यू झाला.

#### आरोपीला बांधून पोलिस ठाण्यात नेले

घटनेनंतर संतप्त जमावाने मनोरुग्ण प्रथमेशला चांगलाच चोप देत त्याचे हातपाय बांधून पोलिसांच्या स्वाधीन केले. तो त्याच्या वाटेत येणार्यांवर सतत हल्ले करत असल्याचे लक्षात येताच परिसरातील सुमारे ५० ते ६० नागरिकांच्या जमावाने त्याला पकडून चांगलाच चोप दिला. त्यानंतर त्याचे हातपाय बांधून लाकडी काठीला बांधण्यात आले. नंतर त्याला खांद्यावर उचलून पोलिस ठाण्यात नेण्यात आले. या प्रकरणातील आरोपीही जखमी झाल्याने त्यास जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# गडगा मध्यम सिंचन प्रकल्प; पाण्याआधी पाईप, शेतीआधी घोषणाच

## मुख्य प्रकल्प अपूर्ण असताना उपयोजनांचा सपाटा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२धारणी–**

मेळघाटातील आदिवासीबहुल शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांतीच दिवास्वप्न घेऊन उभारण्यात आलेला गडगा मध्यम प्रकल्प आज शासनाच्या अपयशी नियोजनाचे जिवंत प्रतीक बनला आहे. सुमारे ७०० कोटी रुपयांच्या प्राथमिक खर्चातून सुरू झालेला हा प्रकल्प आज एकूण १५०० कोटींचा आकडा पार करूनही अपूर्ण अवस्थेतच अडकून पडला आहे. इतक्या प्रचंड निधी खर्चानंतरही मेळघाटातील शेतकऱ्यांच्या शेतात पाण्याचा एक थेंबही पोहोचलेला नाही, ही वस्तुस्थिती शासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. गडगा प्रकल्प पूर्ण न झाल्याने मेळघाटातील हजारो शेतकरी आजही निसर्गाच्या दयेवर शेती करण्यास मजबूर आहेत. सिंचनाअभावी उत्पादनात घट, वाढते इनपुट खर्च, कर्जाचा डोंगर आणि कुटुंबीयांचे जीवनमान ढासळणे, अशा बिकट संकटांच्या विळख्यात धारणी तालुक्यातील शेतकरी सापडले आहेत. शासनाकडून ज्या अपेक्षेने हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता, त्या अपेक्षा आज मातीमोल ठरत असल्याची भावना परिसरात तीव्र होत आहे.

मुख्य गडगा मध्यम प्रकल्प अद्याप पूर्ण नसताना, त्याच प्रकल्पाच्या नावाखाली आर. आर. योजने अंतर्गत जवळपास चाळीस गावांसाठी फिल्टर प्लांटसह पिण्याच्या पाण्याच्या योजना राबवल्या जात आहेत. विशेष म्हणजे, प्रकल्पात अद्याप प्लेट लावून पाणी अडवण्यात आलेले नाही, त्यामुळे धरणात आवश्यक जलसाठाच उपलब्ध नाही. असे असतानाही जवळपास ५० गावांत सिंचनासाठी युद्धपातळीवरपाइपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. मुख्य स्रोतच अपूर्ण असताना त्यावर आधारित उपयोजना यशस्वी कशा ठरणार? असा थेट सवाल आता नागरिक, शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे. पुढे पाठ मागे सपाट अशी स्थिती निर्माण झाल्याची चर्चा परिसरात जोर धरू लागली आहे.गडगा मध्यम प्रकल्पावर गेल्या दहा वर्षांत सुमारे १५०० कोटी रुपयांचा निधी खर्च झाल्याची माहिती आहे. मात्र, आजही प्रकल्प पूर्णत्वाच्या उंबरठ्यावरसुद्धा पोहोचलेला नाही. ही बाब केवळआर्थिक अपव्यय नसून मेळघाटातील शेतकऱ्यांच्या भविष्याशी खेळ असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्हाधिकारी आशिष येरेकर, खासदार बळवंत वानखडे आणि मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालण्याची मागणी जोर धरत आहे. प्रत्यक्ष स्थळभेट देऊन प्रशासनाला ठोस दिशा देणे, कामाची गुणवत्ता, वेळेची पूर्तता आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे अत्यावश्यक असल्याचे शेतकरी आणि नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच नियमबाह्य, निष्काळजी व कामात कुचराई करणाऱ्या कंत्राटदार कंपन्यांवर कठोर कारवाई करून काम वेळेत व दर्जेदार पूर्ण करून घेण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींनी घ्यावी, अशी स्पष्ट मागणी होत आहे.मेळघाटासाठी जीवनवाहिनी ठरण्याचा दावा करणारा गडगा प्रकल्प आज शासनाच्या अपयशी नियोजनाचे स्मारक ठरत असल्याची टीका होत आहे. हजारो कोटी रुपये खर्च करूनही शेतकऱ्यांच्या पदरी आज निराशाच येत आहे. आता तरी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी ठोस निर्णय घेऊन हा प्रकल्प पूर्ण करावा, अन्यथा शासनावरील शेतकऱ्यांचा विश्वास कायमचा डळमळीत होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. दिवास्वप्न कागदोपत्रीच हरवल गडगा प्रकल्प म्हणजे सरकारच्या अपयशाचे जिवंत उदाहरण आहे. हजारो कोटी रुपये खर्च झाले, पण आजही आमच्या शेतात थेंबभर पाणी नाही. आमच्यावर उपकार केल्यासारखे योजना जाहीर केल्या जातात, पण प्रत्यक्षात त्या कागदावरच राहतात, अशी प्रतिक्रिया यशवंत मौड युवा शेतकरी, ग्राम हातीदा यांनी दिली.

# अतिक्रमणांवर हातोडा ! महापालिकेची धडक मोहीम

## अतिक्रमणे काढून घ्या, अन्यथा बुलडोजरः महानगरपालिकेने दिला अल्टिमेटम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–** शहरात अतिक्रमणांची समस्या अतिशय गंभीर झाली आहे. रस्त्याच्या कडेला किंवा जागा दिसेल तिथे अतिक्रमणे केली जातात. काही तर पक्के शेड ठोकून अतिक्रमणे करतात. या अतिक्रमणांमुळेच शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, यांच्या निर्देशानुसार शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. काही जणांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.

महानगरपालिके च्यावतीने



अतिक्रमण मोहिम सुरू असून बुधवारी (ता. २१) जेसीबी व ३ ट्रक द्वारे चित्रा चौक, इतवारा बाजार, टांगा पडाव, चांदनी चौक, नागपुरी गेट, जमील कॉलनी, बलगाव रोड, चौधरी चौक, मालवीय चौक, रेल्वे स्टेशन चौक, परिसर, येथील अतिक्रमण महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. जोपर्यंत शहरातील रस्ते व फूटपाथ मोकळे होणार नाही तोपर्यंत ही अतिक्रमणाची कारवाई सुरू राहील. ज्यांनी अतिक्रमण केलं असेल त्या सर्वांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे अन्यथा तसेच महानगरपालिका प्रशासन काढून येईल. कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागेल, शहरातील मुख्य बाजारपेठ कापड बाजारातील अतिक्रमणांवर देखील लवकरच कारवाई करणार असून त्याबाबत शहरातील इतर भागातील अतिक्रमणे मोकळे करून मुख्य शहरातील अतिक्रमणांवर कारवाई करणार आहेत, नागरिकांना या अतिक्रमणांचा त्रास सहन करावा लागत आहे. या गोष्टींचा विचार करुनच महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमणांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिके चे अतिक्रमण पथक कारवाई करून अतिक्रमणे काढून घेत आहे.सदर कारवाईत अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, संदीप सोनोने, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, कर्मचारी उपस्थित होते. पी.एस.आय, गुलवाडे व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# अचलपूर तालुक्यात शेतमजुराचा संशयास्पद मृत्यू

## मारहाणीचा संशय, पोलीस तपास सुरू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२२अचलपूर–** पोलीस स्टेशन, परतवाडा येथे आज दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी एक गंभीर व धक्कादायक घटना नोंदविण्यात आली आहे. विरू शिवकाली मरस्कोल्हे (वय ५२), रा.काजलडोहा ता. चिखलदरा, जि. अमरावती यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.मृतक विरू मरस्कोल्हे हे मागील आठ दिवसांपासून तूर काढणीच्या कामासाठी अष्टमासिद्धी परिसरात मजुरीसाठी आले होते. त्यांच्या सोबत भोदू (पूर्ण नाव माहिती नाही), रा. काजलडोह हा मित्रही काम करत होता. दोघांमध्ये भांडण झाल्याचा संशय असून मृतकाच्या अंगावर मार लागल्याच्या खुणा आढळून आल्याची प्राथमिक माहिती आहे. या मारहाणीतच मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.घटनेची माहिती मिळताच पो.का. विराज ठाकूर पोलीस स्टेशनचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे पोस्टमार्टमसाठी पाठविण्यात आला आहे. मृतदेह दाखल करताना परिवारिक नातेवाईक व राजू उईके हे उपस्थित होते.या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला असून, पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. भांडण, मारहाण आणि त्यामागील कारणांचा तपास सुरू असून संबंधित व्यक्तींची चौकशी करण्यात येत आहे.दरम्यान, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पुढील तपास अहवालानुसार पोलीस आवश्यक ती कारवाई करणार आहेत.

# निवडणूक कामात स्वच्छतेचा बोजवारा

## घंटागाड्या १५ दिवसांपासून धूळखात:स्वच्छतेचे नवीन कंत्राट सुरू झाल्यानंतरही सर्वत्र कचरा पडून, कंत्राटदाराचे दुर्लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

शहरातील स्वच्छतेची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. अनेक प्रभागांमध्ये मागील १५ दिवसांपासून निवडणुकीच्या धामधुमीत घंटागाड्याच फिरकल्या नसल्याने नागरिकांच्या घरात कचरा साठला आहे. एवढेच नव्हे तर मोकळ्या जागा आणि कंटेनरच्या जवळही कचऱ्याचे ढिग दिसत आहेत. मनपा प्रशासन, नियमित स्वच्छता अधिकारी, कर्मचारी महानगर पालिका निवडणुकीच्या कामात व्यस्त राहिल्याने त्यांचे शहराच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाले. परिणामी शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे.

एकिकडे शहराच्या स्वच्छतेसंदर्भातील तक्रारी सोडवण्यासाठी मनपा स्वच्छता विभागाने ०७२१२६७२३००, ७५१७५१६१६२ हे दोन हेल्पलाईन क्रमांक एक मो.क्र.७०३००९२६४८ उर्वरित, पान४ कोणकोणत्या प्रभागात घंटागाडी निवडणुकीच्या काळात फिरकली नाही, याबाबत तत्काळ सॅनिटरी इन्सपेक्टरला (एसआय) माहिती घेण्यास सांगणार आहे. तसेच स्वच्छता कंत्राटदारालाही याबाबत कळवून तत्काळ कारवाई करण्यास सांगितले जाईल. - डॉ. अजय जाधव, वैद्यकीय स्वच्छता अधिकारी. हातावर पोट असलेले घंटागाडी चालक हे जेथे त्यांना जास्त कमाई होईल, तिकडे प्राधान्याने लक्ष देत असतात. हे साहजिकही आहे. कारण, दु.१२ पर्यंतच ते घंटागाडीवर काम करतात. तुटपुंज्या पगारात कसे भागणार म्हणून नंतर दुसरे काम करावे लागते. अशा बहुतेक घंटागाडी चालकांना यावेळी निवडणुकीच्या निमित्ताने कमाई करण्याची आयतीच संधी मिळाली. त्यामुळे काहींनी १५ दिवसांच्या सुट्या टाकल्या. ते प्रचार कार्यात व्यस्त झाले. अशात झोननिहाय कचरा कंत्राटदाराने त्यांच्या जागी अन्य घंटागाडीची व्यवस्था करणे अनिवार्य असतानाही केले नाही. महानगर पालिका प्रशासन निवडणुकीच्या कामात व्यस्त राहिले. त्यामुळे शहरातील स्वच्छतेकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. एवढेच नव्हे तर स्वच्छता कंत्राटदारांनाही मनपाकडून नियमित देयक (बिल) मिळत नसल्याने तेही वैतागले आहेत. क्षितीज नागरिक बेरोजगार सहकारी संस्थेने झोन क्र. ३ दस्तूरनगरचे स्वच्छता कंत्राट सोडले आहे. इतर स्वच्छता कंत्राटदारही याच विचारात आहेत. मात्र, अद्याप त्यांनी कंत्राट सोडले नाही. दस्तूरनगर झोनमध्येही सर्वत्र कचरा साठला असून मनपाला येथील स्वच्छतेसाठी आणखी ३ ते ४ दिवस लागणार आहेत.

# पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली २४ जानेवारीला डीपीसी सभा

## २०२६-२७ चा विकास आराखडा निश्चित करण्याची लगबग सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला दिशा देणारी महत्त्वपूर्ण जिल्हा नियोजन समितीची (डीपीसी) सभा आगामी शनिवार, २४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. या सभेत सन २०२६-२७ साठीचा विकास आराखडा निश्चित केला जाणार आहे.

राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा शनिवारी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात सुरू होईल. चालू आर्थिक वर्षासाठी (३१ मार्च रोजी संपणारे) अमरावती जिल्ह्याचा विकास आराखडा ४७४ कोटी ७८ लाख रुपये आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षाचा विकास आराखडा निश्चितच ५०० कोटींच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

या बैठकीदरम्यान, विविध विभागांकडून करण्यात येणारी मागणी आणि लोकप्रतिनिधींकडून त्याला दिला जाणारा प्रतिसाद यानंतरच नेमका आकडा निश्चित होईल. तसेच, चालू आर्थिक वर्षात विविध यंत्रणांनी डिसेंबर अखेरपर्यंत केलेल्या खर्चाची पडताळणी करून



त्यास मान्यता दिली जाईल.

गेल्या २९ ऑगस्ट रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताला मान्यता देणे आणि पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार वेळेवर येणाऱ्या इतर विषयांवरही चर्चा करून योग्य ते निर्णय घेतले जातील. या सभेसाठी जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार आणि जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांना निमंत्रणे पाठवण्यात आली आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२५-२६ साठी सुमारे १ हजार ११५ कोटी ८३ लाख ८८ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार ही मागणी केली होती, परंतु नेहमीप्रमाणे ती पूर्णपणे मान्य झाली नाही. गतवर्षीच्या रकमेत थोडीफार वाढ मिळण्याची शक्यता आहे.

या मागणीला अंतिम स्वरूप राज्याच्या अर्थसंकल्पातच मिळणार असल्याने, या सभेचे मागणीपत्र थेट राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठवले जाईल. मागील काही वर्षांपासून डीपीसीच्या बजेटमध्ये वाढ होताना दिसत आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ३९५ कोटी, २०२४-२५ मध्ये ४७४ कोटी आणि २०२५-२६ मध्ये ४१७.७८ कोटी रुपये मंजूर झाले होते, तर मागणी १ हजार ११५ कोटी ८३ लाख ८८ हजार रुपयांची होती.

# चाचा नेहरू जिल्हास्तरीय बाल महोत्सव मध्ये झाले विविध सांस्कृतिक कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

महिला व बाल विकास विभाग अमरावती चे अंतर्गत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय तर्फे तीन दिवसीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये दोन बालपण स्वच्छ द्वितीय दिवसातील द्वितीय सत्रामध्ये संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली त्यामध्ये एकल नृत्य व समूह नृत्य दोन्ही नृत्य प्रकार घेण्यात आले सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचालन श्रीमती वैशाली चोरे मॅडम परिविक्षा अधिकारी यांनी केले तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून माननीय अर्चना ढोरे मॅडम संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती व माननीय प्रशांत दुधी सर यांनी परीक्षक म्हणून भूमिका पार पाडले याप्रसंगी जिल्हा महिला कार्यालयातील सर्व कर्मचारी व जिल्हा महिला बालविकास अधिकारी अतुल भडांगे सर हे सुद्धा उपस्थित होते. सर्व बालगृहातील बालक बालिकांनी अतिशय सुंदर नृत्य विस्तार सादर केले.

# पालखी मिरवणुकीने होणार श्री.गोविंद प्रभू तीर्थस्थान वार्षिक उत्सवास प्रारंभ

## देशभक्ती व देवभक्तीचा अनोखा संगम अनुभवण्यास मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नांदगाव पेठ**

येथील क श्रेणी तीर्थस्थान म्हणून ओळख असलेल्या श्री गोविंद प्रभू तीर्थस्थानाचा वार्षिक उत्सव येत्या दि. २६ व २७ जानेवारी रोजी मोठ्या भक्तिभावात संपन्न होत असून या उत्सवाची सुरुवात श्री प्रभूंच्या भव्य पालखी मिरवणुकीने होणार आहे. या वार्षिकोत्सवानिमित्त संपूर्ण जिल्ह्यातील महानुभाव पंथीय भक्त-भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. वार्षिकोत्सवाच्या तयारीला अंतिम स्वरूप प्राप्त झाले असून प.पू. प.म. श्री.दर्यापूरकर मोठेबाबा यांच्या पावन मार्गदर्शनाखाली तीर्थस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विनय मुनी तसेच सर्व संचालक मंडळ, सेवेकरी व ग्रामस्थ उत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.दि. २६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता श्री प्रभूंची पालखी श्रीकृष्ण महिला भजनी मंडळ,



यावली शहीद, यांचे भजन, ढोल-ताशे, बँड, लेझीम पथक, रथ व विविध वाद्यांच्या गजरात गावातील प्रमुख रस्त्यांवरून भव्य मिरवणुकीने मार्गक्रमण करणार आहे. या पालखी मिरवणुकीत शेकडो बालगोपाल, युवक-युवती, महिला मंडळे व भक्त-भाविक उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. गणराज्य दिनाच्या संध्याकाळी निघणार्या या शोभायात्रेमध्ये देशभक्ती आणि देवभक्तीचा अनोखा संगम अनुभवण्यास मिळणार असून, भक्तिमय वातावरणात संपूर्ण गाव भक्तीरसात न्हाऊन निघणार आहे.पालखी मिरवणूक गावातील मुख्य चौकात पोहोचल्यानंतर प्रतिष्ठित व मान्यवर व्यक्तींच्या हस्ते श्री प्रभूंच्या पालखीचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर विविध धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन व दर्शन सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले आहे.या पावन वार्षिकोत्सवात सहभागी होऊन श्री गोविंद प्रभूंचे दर्शन व कृपाशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन तीर्थस्थान ट्रस्ट व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लाडकी बहीण योजनेत पात्र महिलांचा घोर अपमान; चांदूर बाजारात उद्रेक

## प्रहारचा थेट संघर्षाचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चांदूर बाजार**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या गाजलेल्या योजनेतून अचलपूर तालुक्यातील चांदूर बाजार परिसरातील हजारो पात्र महिलांची नावे कोणतीही पूर्वसूचना न देता वगळण्यात आल्याने संतप्त महिलांनी प्रशासनाविरोधात थेट आवाज उठवला आहे. हा प्रकार म्हणजे गरिब, कष्टकरी महिलांच्या तोंडचा घास हिरावून घेण्याचा सरकारी अन्याय असल्याचा आरोप महिला प्रहार जनशक्ती पक्षाने केला आहे.सर्व अटी, कागदपत्रे व तपासणी पूर्ण करूनही महिलांचे मानधन बँक लिंकिंग, आधार प्रमाणीकरण, तांत्रिक चुकांची सबब देत अचानक थांबवण्यात आले आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे महिलांचे संसार उघड्यावर पडले असून हा प्रकार महिलांच्या सन्मानावर आणि अस्तित्वावर थेट घाला असल्याची तीव्र भावना व्यक्त होत आहे.घरखर्च, चूल, मुलांचे शिक्षण आणि औषधोपचार यासाठी ज्या पैशावर बहिणी अवलंबून होत्या, तो हक्काचा पैसा बंद करून प्रशासनाने महिलांना उपासमारीकडे ढकलल्याचा आरोप महिला प्रहारने केला आहे. कार्यालयांमधून महिलांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात असून कोणतीही ठोस माहिती दिली जात नसल्याने महिलांचा संयम आता सुटत चालला आहे.२१ जानेवारीला तहसील कार्यालयात जाब विचारला.या घोर अन्यायाविरोधात आज दि. २१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता तहसील कार्यालय, चांदूर बाजार येथे महिला प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने ठाम, आक्रमक पद्धतीने निवेदन सादर करण्यात आहे.वेळीच निर्णय न घेतल्यास लोकशाही मार्गाने पण तीव्र, व्यापक आणि प्रशासन हादरवणारे आंदोलन छेडण्याचा थेट इशारा देण्यात आला आहे.

या लढ्याचे नेतृत्व महिला प्रहार जनशक्ती पक्ष, चांदूर बाजार तालुका करीत असूनविदर्भ सरचिटणीस स्टेला मॅडम,मंजू संतोष किटुकले,नेहा अग्रवाल. यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,पात्र महिलांचा एकही हक्क प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे हिरावून घेतला जाऊ देणार नाही. न्याय मिळेपर्यंत संघर्ष थांबणार नाही.प्रशासनाने तातडीने पात्र महिलांचे मानधन सुरू न केल्यास हा लढा तहसील कार्यालयाच्या चौकटीबाहेर जाऊन रस्त्यावर उतरेल, असा स्पष्ट इशारा महिला प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

# मेळघाटातील कुपोषणावर हायकोर्टाचा राज्य सरकारला कडक इशारा

## गर्भवती व स्तनदा मातांच्या मृत्यूवर तीव्र नाराजी; 'झिरो टॉलरन्स' धोरणाची सक्त अंमलबजावणी करण्याचे दिशानिर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मेळघाट**

मेळघाटातील आदिवासी पट्ट्यात कुपोषणामुळे होणार्या गर्भवती व स्तनदा मातांच्या मृत्यूंची मालिका रोखण्यात सरकार अपयशी ठरत असल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने सरकारवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. या गंभीर सामाजिक संकटाकडे शासनाकडून अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचे नमूद करत न्यायालयाने या प्रकरणात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर मेळघाटातीलझालेल्या कुपोषणामुळे मृत्यूंसंदर्भातील याचिकांवर सुनावणी सुरू असताना ही निरीक्षणे नोंदविण्यात आली. गेल्या काही महिन्यांत ११५ हन अधिक गर्भवती व स्तनदा महिलांचे मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्यानंतर न्यायालयाने, ही बाब अत्यंत धक्कादायक असून शासनाच्या आरोग्य व सामाजिक सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे, असे ठामपणे नमूद केले.न्यायालयाने स्पष्ट केले की, सर्व मृत्यू हे केवळ कुपोषणामुळेच झाले नसले तरी त्यामागे असलेल्या मूळ कारणांचा शोध घेऊन दोषींवर जबाबदारी निश्चित करणे अनिवार्य आहे.



सरकारी वकिलांनी मृत्यूंची काही कारणे सामाजिक आणि वैद्यकीय स्वरूपाची असल्याचे सांगितले. मात्र, न्यायालयाने कारणे कोणतीही असोत, नागरिकांचे जीव वाचवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे, असे ठासून सांगितले.सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांनी माहिती दिली की, मेळघाटात अनेक मुलींची वयाच्या १३ व्या वर्षीच लग्ने होतात. त्यानंतर अल्पावधीतच त्या गर्भवती राहतात. अकाली प्रसूती, पोषणतूट आणि अपुरी वैद्यकीय सुविधा यामुळे गंभीर गुंतागुंत निर्माण होते आणि अनेक वेळा मातांचे जीव धोक्यात येतात.या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने ज्यांना सर्वाधिक गरज आहे, त्या घटकांपर्यंत विशेष योजना, मूलभूत आरोग्यसेवा, पोषण आहार आणि आवश्यक सोयी-सुविधा तातडीने पोहोचवल्या पाहिजेत, असे निर्देश राज्य सरकारला दिले असून न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, गेल्या दोन-तीन दशकांपासून ही स्थिती कायम असून, ही समस्या सामान्य मानून चालणार नाही. या मृत्यूंविषयी सरकारने 'झिरो टॉलरन्स'चा दृष्टिकोन स्वीकारावा. ही केवळ आकडेवारी नाही, तर जिवंत माणसांचे प्रश्न आहेत, असे निरीक्षण देखील खंडपीठाने नोंदविले.तसेच या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने नेमकी कोणती ठोस कार्ययोजना आखली आहे, याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. तसेच, मेळघाटातील ग्रामीण व आदिवासी भागात जनजागृती वाढवून बालविवाह रोखणे, पोषण विषयक शिक्षण देणे आणि महिलांसाठी आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याचेही न्यायालयाने अधोरेखित केले.

# 'खासदार झाले म्हणजे पक्षाचे मालक होत नाहीत; धानोरकरांवर वडेट्टीवारांची थेट तोफ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नागपूर**

खासदार झाले म्हणून पक्षाचे 'मालक' ठरत नाहीत. संयमाने आणि सर्वांना सोबत घेऊन काम करावे लागते. वैचारिक मतभेद असू शकतात; मात्र त्यावरून कार्यकर्त्यांना डावलणे किंवा तिकीट कापणे योग्य नाही, अशा शब्दांत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. जुना इतिहास काढायचा ठरला, तर बाळू धानोरकर यांना काँग्रेसमध्ये आणण्यापासून ते प्रतिभा धानोरकर यांच्या प्रवेशापर्यंतचा सगळा प्रवास माझ्यासमोरच झाला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

तिकीट कापणे योग्य नाही, अशा शब्दांत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार



यांनी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. जुना इतिहारा काढायचा ठरला, तर बाळू धानोरकर यांना काँग्रेसगध्ये आणण्यापासून ते प्रतिभा धानोरकर यांच्या प्रवेशापर्यंतचा सगळा प्रवास माझ्यासमोरच झाला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, खासदार आणि नेते यांचे काम वेगवेगळे असते. खारादार झाल्याने कुणी पश्वाचा मालक होत नाही. पक्ष कार्यकर्त्यांचा अरातो. प्रतिभा धानोरकर यांचे वक्तव्य गैरसमज मधून झाले असावे त्यांनी संयम ठेवून बोलावे त्यांचे राजकीय भविष्य मोठेआहे. आमच्यात कुठलाही वाद नाही, असा दावाही त्यांनी केला.गेल्या २५ वर्षांपासून जिल्ह्याची जबाबदारी आपण सांभाळत असल्याचे सांगत वडेट्टीवार म्हणाले की, प्रतिभा धानोरकर सहा वर्षांपूर्वी पक्षात आल्या. जुने काँग्रेस कार्यकर्ते ज्यांनी पक्ष उभा केला त्यांनाच बाजूला केले त्यामुळे आता पक्ष कसा वाढेल असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.नगरपरिषद निवडणूकित कार्यकर्त्यांनी जीव ओतून काम केले.त्यावेळी खासदार यांचा काहीही सहभाग नव्हता महानगर पालिका निवडणूकित दोघांच्या सहमतीने ६० जागांवर उमेदवारी देण्याचे ठरले असतांना वसंत पुरके यांच्या आग्रहास्तव सहा जागांवर उमेदवारी बदलण्यात आली त्यापैकी केवळ दोनच उमेदवार निवडून आले त्यामुळे पक्षाचे मोठे नुकसान झाले असल्याचे ही वेडट्टीवार म्हणालेत.

# उद्यापासून तीन दिवसीय कुऱ्हा महोत्सवाचे आयोजन

## विविध स्पर्धा व कार्यक्रमांची मेजवानी : चांदूर रेल्वेच्या नगराध्यक्षा प्रियंका निलेश विश्वकर्मांचा होणार सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वेवरून १७ कि.मी. अंतरावर असलेल्या कुऱ्हा येथील शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही कुऱ्हा महोत्सव २०२६ हा २३ ते २५ जानेवारी दरम्यान वाचनालय परिसरात आयोजित केला आहे. महोत्सवाचे स्वागताध्यक्ष उद्योजक मनोज दारोकार हे आहेत.

पहिल्या दिवशी शुक्रवार, २३ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता भव्य ग्रंथ दिंडी गावातून निघणार असुन यात महिला बचत गट, गावातील भजन मंडळ व सर्व शाळा सहभागी असणार आहे. यानंतर लगेच डिश डेकोरेशन स्पर्धा होणार आहे. सकाळी ११ वाजता स्व. कु. तिर्था राजेश टेकाडे स्मृतिप्रित्यर्थ मोफत आरोग्य शिबीराचेही आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १२ वाजता रस्सीखेच स्पर्धा होईल. तर दुपारी ३ वाजता उद्घाटन समारंभ पार पडणार आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे राहणार असुन उद्घाटन भाजपाचे संघटनमंत्री उपेंद्र कोठेकर यांच्या हस्ते होणार आहे. विशेष व प्रमुख अतिथी म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार राजेश वानखडे, आमदार सुमित वानखडे, पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, भा.ज.पा. प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, एसडीओ दादासाहेब दराडे, तहसिलदार डॉ. मयुर कळसे, गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, सरपंच मिना नायर, सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, निरीक्षक, जिल्हा ग्रंथालय दिपक गेडाम आदींची उपस्थिती होती. यावेळी वेगवेगळया क्षेत्रामधील यशस्वीतांचा सत्कार होणार आहे. यानंतर सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला असुन याचे उद्घाटक भाजपा तालुकाध्यक्ष सागर शिंगाणे यांच्या हस्ते होणार आहे. तर सत्कारमुर्ती चांदूर रेल्वेच्या नगराध्यक्षा प्रियंका निलेश विश्वकर्मा राहणार आहे. यानंतर दुसऱ्या दिवशी शनिवार, दि. २४ जानेवारीला सकाळी ६ वाजता एकता मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. सकाळी ११ वाजता कराओके स्पर्धा होणार असुन याला प्रमुख अतिथी म्हणून कराओके क्लब गजेंद्र पाखरे हजर राहणार आहे. यानंतर दुपारी २ वाजता राष्ट्रभक्त शहीद ए आजम भगतसिंग या विषयावर राष्ट्रीय व्याख्याते ॲड. दिलीप कोहळे यांचे व्याख्यान होणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला असुन याचे उद्घाटन डान्स आर्टीस्ट वैष्णवी डाहाके यांच्या हस्ते होईल व प्रमुख अतिथी म्हणून ठाणेदार डॉ. अनुप वाकडे राहणार आहे. शेवटच्या दिवशी रविवार, २५ जानेवारीला सकाळी ८ वाजता स्लो सायकल स्पर्धा, सकाळी ९ वाजता सब खेलो सब जीतो स्पर्धा, दुपारी १२ वाजता वादविवाद स्पर्धा, दुपारी १ वाजता मेहंदी स्पर्धा तर दुपारी २ वाजता महिला मेळाव्याचे आयोजन केले आहे. यात खेळ पैठणीचा हे विशेष आकर्षण राहणार आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आरती राजेश वानखडे ह्या राहणार असुन विशेष अतिथी म्हणून माजी सभापती कविता पचलोरे, सत्कारमुर्ती नगराध्यक्षा अर्चना रोठे (अडसड), नगराध्यक्ष रुपाली अभय माथने ह्यांची उपस्थिती राहणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता बक्षिस वितरण होणार आहे. यानंतर कवि संमेलनाने महोत्सवाचा शेवट होणार आहे. यात सादरकर्ते शब्दनक्षत्र साहित्य संघ, आर्वी आहे. तरी या महोत्सवाचा परिसरातील व जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कुऱ्हा महोत्सव पुरुष समितीचे अध्यक्ष राजेश माणिकराव टेकाडे, महिला उत्सव समितीच्या अध्यक्षा भाग्यश्री कुऱ्हाडे, शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष विवेक बिंड व इतर कार्यकारीणी मंडळ, गावकऱ्यांनी केले आहे.

# अचलपूर नगरपरिषदेत भाजप-एमआयएम युती

## समिती सभापती निवडीत राजकीय समीकरणांना कलाटणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अचलपुर**

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर नगरपरिषदेत आज राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारी घडामोड समोर आली आहे. नगरपरिषदेमधील विविध समित्यांच्या सभापती पदांच्या निवडीदरम्यान भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि एमआयएम यांच्यात अनपेक्षित युती झाल्याचे स्पष्ट झाले असून, या युतीमुळे स्थानिक राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, समितीच्या सभापती पदासाठी भाजप आणि एमआयएमने एकमेकांना साथ दिली. या राजकीय समन्वयाचा परिणाम म्हणून एमआयएमच्या नगरसेवकाला शिक्षण व क्रीडा समितीचे सभापती पद मिळाले आहे. विशेष म्हणजे, भाजपने या निवडीत एमआयएमच्या उमेदवाराला पाठिंबा दिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.या युतीत केवळ भाजप आणि एमआयएमच नव्हे, तर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन नगरसेवक तसेच तीन अपक्ष नगरसेवकही भाजपसोबत उभे राहिल्याची माहिती आहे. त्यामुळे नगरपरिषदेत सत्तासमीकरणे पूर्णतः बदलली असून, विरोधकांना हा अनपेक्षित धक्का मानला जात आहे.अचलपूर नगरपरिषदेत भाजप आणि एमआयएम एकत्र आल्याने राजकीय आघाड्यांबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. वैचारिकदृष्ट्या परस्परविरोधी मानल्या जाणाऱ्या पक्षांमधील ही जवळीक आगामी स्थानिक राजकारणावर काय परिणाम करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या घडामोडीमुळे अचलपूरच्या राजकीय वातावरणात चांगलेच तापमान वाढले असून, पुढील काळात या युतीमुळे कोणते निर्णय घेतले जातात आणि नगरपरिषदेत कारभाराची दिशा कशी राहते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.अचलपूर शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा केंद्रबिंदू आहे. सर्व पक्षांना विश्वासात घेऊन निर्णय घेतले जातील. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी नगरपालिकेची प्रत्येक समिती जबाबदारीनं काम करेल, असं अचलपूरच्या नगराध्यक्षा रूपाली माथने यांनी स्पष्ट केलंय.

# नवीन बांधकामांतील प्लंबिंग-इलेक्ट्रीक साहित्य चोरी प्रकरणी कुख्यात आरोपी अटकेत

## २.२२ लाखांचा मुद्देमाल जप्त, ४ गुन्हे उघड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावती शहर गुन्हे शाखेने प्रभावी कारवाई करत नवीन बांधकामाधीन इमारतींमधून प्लंबिंग व इलेक्ट्रीक वायरचे बंडल चोरणाऱ्या सराईत आरोपीला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत एकूण २,२२,७११ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीकडून चार गुन्हे उघडकीस आले आहेत.गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन नागपुरी गेट हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, अकबर नगर परिसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगार शेख जहीर उर्फ राजा हा जगवार कंपनीचे नळ व इतर प्लंबिंग साहित्य विक्रीसाठी कबाडी व्यावसायिकांकडे फिरत आहे. प्राप्त माहितीनुसार पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे यांच्या पथकाने अकबर नगर येथून संशयिताला ताब्यात घेतले.चौकशीत आरोपीने आपले नाव जहीर खान वल्द जमीन खान उर्फ राजा, वय २१ वर्षे, रा. अकबर नगर पूलाजवळ, पो.स्टे. नागपुरी गेट असे सांगितले. सखोल विचारपूस केली असता त्याने दोन दिवसांपूर्वी सामरा नगर, जुना बायपास, एमआयडीसीजवळील नवीन बांधकामाधीन इमारतीतून साथीदार शेख अझरुद्दीन शेख कमरुद्दीन (रा. अकबर नगर, सध्या फरार) याच्यासह प्लंबिंग व इलेक्ट्रीक साहित्य चोरी केल्याची कबुली दिली.या प्रकरणी पोलीस स्टेशन राजापेठ येथे अपराध क्रमांक ४४/२०२६ अन्वये भादंवि कलम ३०५(अ), ३३३(३), ३३१(४) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात जगवार कंपनीचे शॉवर, स्पाउट, वेस्ट कपलिंग, कन्सील कॉक बॉडी, बेसिन कन्सील पार्ट, एंगल कॉक आदी प्लंबिंग साहित्य (किंमत अंदाजे १,२०,७११ रुपये), गुन्ह्यात वापरलेली ॲक्टिव्हा दुचाकी क्रमांक एम.एच.२७/ईए/७०२८ (अंदाजे किंमत १,००,००० रुपये) तसेच रोख २,००० रुपये असा एकूण २,२२,७११ रुपयांचा मुद्देमाल समाविष्ट आहे.

# AIMIM नेते सहर शेख यांच्या विधानावर भाजपचा पलटवार; नवनीत राणा यांचा जोरदार हल्ला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

AIMIM च्या नगरसेवक सहर शेख यांच्या विधानावरून राजकीय वातावरण तापले असून भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांनी तीव्र शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. या देशाला पूर्णपणे ‘ग्रीन’ करण्याची भाषा करणाऱ्यांना पाकिस्तानला जावे लागेल. या देशात भगवा आणि निळाच चालेल, असे नवनीत राणा यांनी ठणकावून सांगितले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा संदर्भ देत नवनीत राणा म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितले होते की हे राज्य धर्म आणि राष्ट्रासाठी काम करणाऱ्यांचे आहे. आम्ही धर्मासाठी काम करतो; त्यासाठी जगूही आणि मरूही. कोणी कितीही ‘ग्रीन’ करण्याच्या घोषणा दिल्या तरी त्यांचे स्वप्न कधीच पूर्ण होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.देशात असे कार्यकर्ते आहेत जे केवळ राजकारणासाठी नव्हे तर विचारधारा रक्तात भिनवून काम करतात, असे सांगत नवनीत राणा म्हणाल्या, आमचे विचार छत्रपती शिवाजी महाराजांचे आहेत. ते आमच्या रक्तात वाहतात. आमच्या अंगात रक्त असेपर्यंत या देशातून भगवा कोणीही मिटवू शकत नाही.या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून AIMIM आणि भाजपमधील वैचारिक संघर्ष उघडपणे समोर आला आहे. आगामी काळात या मुद्द्यावरून दोन्ही पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# दोन पदावर कार्यरत राहून मानधन घेणे पडले महागात

## कुरळ पूर्णा येथील महिला पोलीस पाटील निलंबित अचलपूर उपविभागीय अधिकारी यांचे आदेश



### तान-तनाव पोलिसांवर ,पोलीस पाटील नाम मात्र

चांदुर बाजार तालुक्यातील काही पोलीस पाटील पदावर कार्यरत राहून कर्तव्यात कसूर करतात काही पोलीस पाटील गावात राहत नसून अमरावती अशा शहरात राहून ये-जा करतात चांदूर बाजार ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली व अवैध व्यवसायात ही मोठी वाढ झाली आहे व पोलीस पाटील यांच गावात लक्ष राहत नसल्याच अनेकदा आढळले आहे पोलीस पाटील ही पदवी मात्र चांदूर बाजार तालुक्यातील काही गावात नाममात्र राहली असून काही पोलीस पाटील शासनाची सुद्ध फसवूक करित आहे त्यामुळे पोलीस विभागावर मोठा तान वाढल्याच बोलल्या जात आहे.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि २२चांदुर बाजार**

चांदुर बाजार तालुक्यातील कुरळपूर्णा येथील महिला पोलीस पाटील संगीता संदीप मोहोड यांना ३ महिन्याकरिता निलंबित करण्यात आले अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी हा आदेश दिला आहे कुरळपूर्ण येथील ग्रामस्थ गोपाल वासनकर यांनी दिलेल्या तक्रारीवर ही कार्यवाही करण्यात आली असून तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्थेचे रक्षक म्हणून पोलीस पाटील हे राज्याच्या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेत महत्वाचे स्थान असलेले पद आहे पोलीस पाटील हा पोलीस विभाग आणि स्थानिक समुदाय यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणून सुद्धा काम पाहतो मात्र अनेक पोलीस पाटील निष्काळजीपणे व बेजबाबदार पणे वागतात असाच एक प्रकार चांदुर बाजार तालुक्यातील कुरळपूर्णा येथिल महिला पोलीस पाटील सुनीता संदीप मोहोड यांच्या अंगलट आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे माहिती नुसार तक्रारदार गोपाल वासनकर यांनी महिला पोलीस पाटील एकाच वेळी पादावर राहून वेतन घेत असल्याची तक्रार जिल्हाधिकारी,अप्पर जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या कडे दाखल केली होती संगीता मोहोड यांना महिला पोलीस पदावर कार्यरत राहून या पदाचे मानधन मिळत आहे दरम्यान महिला पोलीस पाटील कंत्राटी पदावरही कार्यरत राहून कंत्राटी पदाचेही मानधन घेत असल्याच गोपाल वासनकर यांनी वरिष्ठ अधिकारांच्या निदर्शनात आणले अधिकाऱ्यांनी महिला पोलीस पाटील यांना खुलासा सादर करण्याबाबत सांगितले असता संगीता मोहोड यांचा खुलासा वरिष्ठ अधिकाऱ्यांना असमाधानकारक दिसून आला कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर एका पदावर मानधन घेत असताना दुसऱ्या कंत्राटी पदावरही मानधन घेत असल्याच सिद्ध झाले याचीच दखल घेत उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ चे कलम ९ (ड) अन्वये नुसार महिला पोलीस पाटील संगीता मोहोड यांना ३ महिन्यासाठी निलंबित करण्यात आले असा आदेश काढण्यात आला आहे व तालुक्यातील कर्तव्यात कसूर करणारे काही पोलीस पाटीलही प्रशासनाच्या रडारवर आहेत.

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त अमरावतीत भव्य जनजागृती रॅली

## प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्या हस्ते शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने अमरावती शहरात गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. माननीय प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मिला पवार यांच्या आदेशानुसार आयोजित या रॅलीला त्यांनी स्वतः हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला. रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण रोखणे व नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती निर्माण करणे, हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता.या रॅलीत शहरातील सर्व मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक व प्रशिक्षक आपल्या प्रशिक्षण वाहनांसह सहभागी झाले होते. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, शासकीय वाहनचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीदरम्यान वाहतूक नियम पाळा, सुरक्षित रहा, हेल्मेट व सीटबेल्ट वापरा, वेगमर्यादा पाळा, वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळा तसेच मद्यपान करून वाहन चालवू नका असे महत्त्वाचे संदेश फलक व घोषणांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आले.प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी यावेळी उपस्थित मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे चालक व संचालकांना मार्गदर्शन करताना, नवशिक्या वाहनचालकांना अधिक शिस्तबद्ध, नियमबद्ध व सुरक्षित वाहनचालनाचे प्रशिक्षण देण्याचे आवाहन केले. वाहनांची नियमित फिटनेस तपासणी, फिटनेस ट्रॅकचा योग्य वापर तसेच सुरक्षित वाहनचालनाची सवय लावणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.या रॅलीत जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर, श्री आशिष जयसिंगपुरे, श्रीमती निलिमा काळबांडे, मोटार वाहन निरीक्षक श्री सचिन बडगे, श्री सतीश राठोड, श्री शोएब शेख, श्री अमोल बोरे, श्री सिद्धार्थ दहिकर, श्री राहुल सरकटे, श्री ऋषिकेश पाटील, कुमारी कांचन जाधव, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक तसेच इतर अधिकारी व वाहनचालक सहभागी झाले होते.या जनजागृती रॅलीमुळे नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत सकारात्मक संदेश जाईल व अपघातांचे प्रमाण कमी करण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अस्वलीच्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी; सेमाडोह परिसरातील घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

चिखलदरा तालुक्यातील सेमाडोह येथे एका तरुण शेतकऱ्यावर अस्वलाने हल्ला केल्याची घटना बुधवारी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या हल्ल्यात शेताकडे जात असलेले शेतकरी शोभेराम बाबूलाल कासदेकर (४५) हे गंभीर जखमी झाले.

शोभेराम कासदेकर हे शेतकरी सकाळच्या सुमारास शेताकडे जात असताना अचानक जंगलातून बाहेर आलेल्या अस्वलाने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात शेतकऱ्याच्या शरीरावर गंभीर दुखापती झाल्या आहेत.


**सेमाडोह परिसरातील घटना**

जखमी शोभेराम यांना तत्काळ सेमाडोह येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करून प्राथमिक उपचार देण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाल हलविण्यात आले. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, वनविभागाने अस्वलांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवून नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# अमित साटमांनी नियम सांगत ठाकरे गटाचे आरोप फेटाळले, म्हणाले - नीट अभ्यास करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

मुंबई महानगरपालिकेसाठी आरक्षण सोडत जाहीर झाली आहे. या आरक्षण सोडतीनुसार, मुंबई महापालिकेवर पुन्हा एकदा महिला राज आले आहे. मुंबई महापालिका ही सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहे. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महापालिका असलेल्या मुंबईची धुरा ही महिलेच्या हाती जाणार, हे आता स्पष्ट झाले आहे. पण, महायुती आता त्यांच्यातील कोणत्या महिलेच्या गळ्यात महापौराची माळ घालणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. पण सोडत जाहीर होत असताना शिवसेना ठाकरे गटाकडून या सोडतीवर आक्षेप नोंदवण्यात आला. लॉटरी ठरवून काढण्यात आल्याचे म्हणत किशोरी पेडणेकरांनी आक्षेप घेतला. ज्यानंतर आता याबाबत भाजप आमदार तथा मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी नियम सांगत ठाकरे गटाचे आरोप फेटाळून लावले आहेत.



मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी गुरुवारी (ता. २२ जानेवारी) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, आक्षेप घेणाऱ्यांचा अभ्यास पूर्ण नाही, असे मला वाटते. त्यांनी नियमाचे वाचनही केले नाही. नियम समजूनही घेतले नाही आणि प्रक्रियाही समजून घेतली नाही. या ठिकाणी नागरीविकास खात्याच्या नियम क्रमांक ३ (१)/ ३/१ च्या नियमामध्ये स्पष्टपणे असे लिहिले आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये किमान ३ नगरसेवक हे एसटी प्रवर्गातील असतील तरच एसटीचे आरक्षण हे महापौराला लागू केले जाऊ शकते. मुंबई महापालिकेमध्ये तीन पेक्षा कमी म्हणजे दोनच एसटी आरक्षित असे नगरसेवक, नगरसेविका असल्यामुळे नागरविकास खात्याच्या नियमानुसार, या ठिकाणी एसटीचे आरक्षण मुंबई महापौराला लागू केले जाऊ शकत नाही. आक्षेप घेणाऱ्यांना विनंती की त्यांनी नियमांचा नीट अभ्यास करावा, असे अमित साटम यांनी सांगितले आहे.

# अमरावतीत ‘अमृत कौशल्य उद्योग वर्धन’ प्रशिक्षण राबवण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत अमरावती येथे खुल्या प्रवर्गातील लक्षित गटासाठी ‘अमृत कौशल्य उद्योग वर्धन’ प्रशिक्षण कार्यक्रम लवकरच राबवण्यात येणार आहे.हा कार्यक्रम केवळ मार्गदर्शन किंवा सैद्धांतिक शिक्षणापुरता मर्यादित नसून, प्रत्यक्ष व्यवसाय कसा सुरू करायचा व यशस्वीपणे कसा चालवायचा याचे अनुभवाद्वारे आणि प्रात्यक्षिक स्वरूपात दिले जाणारे प्रत्यक्ष शिक्षण म्हणजेच प्रशिक्षण असल्याचे अमृत संस्थेच्या वतीने अमरावती विभाग व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर यांचेकडून सांगण्यात आले आहे.या प्रशिक्षणामध्ये उद्योग उभारणीपासून उत्पादन प्रक्रिया, कच्चा माल निवड, पॅकिंग, ब्रँडिंग, विक्री, डिजिटल मार्केटिंग, आर्थिक नियोजन तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार आहे.‘करून शिकणे’ (Learning by Doing) या संकल्पनेवर आधारित असलेल्या या उपक्रमामुळे प्रशिक्षणार्थींना उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव मिळणार असून आत्मविश्वासाने स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी ते सक्षम होणार आहेत.अमरावती जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांतील युवक-युवती व नवउद्योजकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक संपर्कासाठी जिल्हा व्यवस्थापक केदार गोगरकर ९११२२२७६३५ तसेच जिल्हा उपव्यवस्थापक ऋषिकेश कथलकर ७२४९४५११५२ यांच्याशी संपर्क करावा.तसेच अमृत विभागीय कार्यालय, घर क्रमांक ३३ आशीर्वाद बिल्डिंग, विदर्भ हाउसिंग कॉलनी मालटेकडी समोर बस स्टँड रोड अमरावती ४४४६०२ येथे भेट द्यावी.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत